## अंतरंग


महावितरणची ग्राहकांसाठी सोलर रुफटॉप योजना/२

नेरळमध्ये एकाच रात्रीत तीन दुकाने फोडली/५

भारतीय फुटबॉल संघ ठरला सॅफ चॅम्पियन/८



रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १५ ◆ अंक ३४८

www.ramprahar.com

गुरुवार, ६ जुलै २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२



।। विद्या विनयेन शोभते ।।
Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's
CHANGU KANA THAKUR
Arts, Commerce and Science College, New Panvel (Autonomous)
Dr. C. D. Deshmukh Centre for Administrative Services
७५,००० पदांची भरती
स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र
तलाठी मार्गदर्शन शिबीर
आणि ग्रामसेवक कृषिसेवक
आरोग्यसेवक
पोलीस भरती
जिल्हापरिषदेमधील
व इतर सरळसेवा
CONTACT: 9833177551/9223555779 | WEBSITE: www.ckthakurcollege.net


# महाराष्ट्राचा विकास हेच स्वप्न!

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केल्या भावना

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकांचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही सत्तेत आलो आहोत. वैयक्तिक स्वार्थासाठी हा निर्णय घेतलेला नाही. साहेबांच्या छत्रछायेखाली मी घडलो. आजही ते श्रद्धास्थान आहेत. सर्व जाती-धर्माच्या लोकांना घेऊन पुढे जायचे आहे. महाराष्ट्राचा विकास हेच स्वप्न आहे, असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि. ५) येथे केले. ते पक्षाच्या बैठकीत बोलत होते.



वांद्रे येथील मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट सभागृहात झालेल्या या बैठकीस राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष व मंत्री सुनील तटकरे, मंत्री छगन भुजबळ, दिलीप वळसे-पाटील, हसन मुश्रीफ, धनंजय मुंडे, महिला प्रदेशाध्यक्ष रूपाली चाकणकर, ज्येष्ठ नेते रामराजे नाईक-निंबाळकर, नरहरी झिरवळ यांच्यासह प्रमुख नेते, आमदार, खासदार, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपल्या पक्षाला कुठेही दृष्ट लागून द्यायची नाही. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेला २५ वर्षे पूर्ण झाली आहेत, पण आपली राष्ट्रीय मान्यता रद्द झाली आहे. ही पक्षाची मान्यता पुन्हा मिळवायची आहे, असे उपमुख्यमंत्री पवार म्हणाले.

आपल्या भाषणात उपमुख्यमंत्री पवार यांनी आमदार जितेंद्र आव्हाड आणि ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांना लक्ष्य केले. तो ठाण्याचा पठ्ठ्या म्हणत त्यांनी आव्हाडांवर अप्रत्यक्षपणे प्रहार केला, तर काही पक्षाचे प्रवक्ते बोलून चांगल्याचे वाटोळे करतात, असे म्हणत राऊतांवर निशाणा साधला.

## आमच्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरलंय -ना. छगन भुजबळ



मंत्री. छगन भुजबळ यांनी या वेळी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांच्याविषयी अपार प्रेम आणि श्रद्धा असल्याचे सांगून आमच्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरल्याचा आरोप केला. लोक म्हणतात शरद पवार यांचा फोटो का लावला, तर ते आमचे विठ्ठल आहेत, मात्र या विठ्ठलाला बडव्यांनी घेरले आहे. साहेब, तुमच्याभोवती जे बडवे आहेत, त्यांना बाजूला करा. आम्ही तुमच्यासोबत आहोत. आजही आमच्या मनात तुमच्याबद्दल प्रेम आहे. आम्हाला आशीर्वाद द्या, असे ना. भुजबळ म्हणाले.

## विरोधी पक्षांच्या बैठकीवर प्रफुल्ल पटेलांची टीका



केंद्रातील भाजपप्रणित एनडीए सरकारला सत्तेतून दूर ठेवण्यासाठी देशातील प्रमुख विरोधी पक्षांची बैठक नुकतीच पाटणा येथे झाली होती. या बैठकीवर राष्ट्रवादीचे ज्येष्ठ प्रफुल्ल पटेल यांनी मेळाव्यात सडकून टीका केली. काही दिवसांपूर्वी झालेल्या विरोधी पक्षांच्या बैठकीत मी साहेबांबरोबर गेलो होतो. त्या बैठकीमध्ये जे चित्र मी पाहिले त्यावर मला हसू येते होते. त्या १७ पक्षांमध्ये सात पक्ष असे होते ज्यांचा खासदार प्रत्येकी एक, शिवाय एक पक्ष तर असा होती ज्याचा खासदार शून्य आणि म्हणत होते आम्ही परिवर्तन घडवून आणणार. लोकांना यावर विश्वास बसेल का सांगा तुम्ही? पण आम्ही हा जो निर्णय घेतला तो राज्याच्या हितासाठी, आपल्या पक्षाच्या हितासाठी, आपल्या लोकप्रतिनिधींच्या मतदारसंघाच्या हिताकरिता घेतला आहे.

## अजित पवारांनी योग्य वेळी योग्य निर्णय घेतला -ना. सुनील तटकरे



राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष तथा मंत्री सुनील तटकरे या वेळी बोलताना म्हणाले की, अजित पवार यांनी योग्य वेळी योग्य तो निर्णय घेतला. राजकारणात काही वेळा अशी परिस्थिती निर्माण होते की, कठोर निर्णय घ्यावे लागतात, काही पावले उचलावी लागतात. उद्याचे भवितव्य चांगले करण्यासाठी काही निर्णय घ्यावे लागतात आणि तो निर्णय अजित पवार यांनी घेतला. म्हणून मी तुमचे अभिनंदन आणि आभार मानू इच्छितो. त्यांनी पुढे म्हटले की, अजित पवार यांनी गेल्या २५ वर्षांत आपले वेगळे स्थान निर्माण केले आहे. कधी कोणत्या कार्यक्रमाला ते गेले नाहीत, तर त्यांची राष्ट्रीय पातळीवर बातमी होते. हे त्यांच्या कर्तबगारीचे फलित आहे. अपमान गिळून अजितदादांनी पक्षाची संघटना मजबूत करण्याचे काम केले आहे.

## अजितदादांचा राष्ट्रवादी पक्ष व चिन्हावर दावा

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

**निवडणूक आयोगाकडे याचिका दाखल**

राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये उभी फूट पडल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी निवडणूक आयोगाकडे याचिका दाखल केली असून पक्ष आणि निवडणूक चिन्ह घड्याळ या दोन्हींवर दावा सांगितला आहे.

विशेष म्हणजे शपथविधीच्या दोन दिवस आधीच ही याचिका निवडणूक आयोगाकडे दाखल करण्यात आली आहे. या याचिकेसोबत दिलेल्या पत्रात ४० आमदारांच्या सह्या असल्याचे समोर आले आहे तसेच अजितदादांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे, असा उल्लेखही या याचिकेत करण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते.



# आदिवासी महिलांची उच्च शिक्षणात होणारी प्रगती आशादायी -राष्ट्रपती

## गडचिरोलीतील गोंडवाना विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ

**गडचिरोली : प्रतिनिधी**

आदिवासी समाज विविध कारणांनी मागास समजला जात असला तरी या समाजातील महिलांची उच्च शिक्षणात वाढत असलेली प्रगती आशादायी आहे. महिला सशक्तीकरणाच्या दृष्टीने हे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन देशाच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी बुधवारी (दि. ५) केले. त्या गडचिरोली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या दहाव्या दीक्षांत समारंभात मुख्य अतिथी म्हणून त्या बोलत होत्या.

या समारंभास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, राज्यपाल रमेश बैस, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, आदिवासी विकासमंत्री डॉ. विजयकुमार गावीत, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रशांत बोकारे प्रामुख्याने उपस्थित होते. या वेळी राष्ट्रपतींच्या हस्ते उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीसाठी सहा विद्यार्थ्यांना सुवर्णपदक प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

दीक्षांत समारंभात सुमारे ४५ पदवीधर आणि ६१ टक्क्यांपेक्षा जास्त सुवर्णपदक विजेत्या या विद्यार्थिनी आहेत. या विद्यार्थिनींची कामगिरी कौतुकास्पद असून इतर विद्यार्थिनींना यापासून प्रेरणा मिळेल. गोंडवाना विद्यापीठ हे या क्षेत्रातील वनसंपदा, खनिज संसाधन, आदिवासींची कला आणि संस्कृतीच्या योग्य विकास आणि संरक्षणासाठी कार्यरत असल्याबद्दल राष्ट्रपती मुर्मू यांनी समाधान व्यक्त केले.

राष्ट्रपती पुढे म्हणाल्या की, मागास समुहाच्या उत्थानात शिक्षणाची भूमिका महत्त्वपूर्ण आहे. हा समूह पुढे जाऊ इच्छितो, मात्र त्यासाठी त्यांना संधी उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे आणि गोंडवाना विद्यापीठाने त्या दृष्टीने उचित पावले उचलली आहेत. केंद्र सरकारने आकांक्षित जिल्ह्यांमध्ये गडचिरोलीचा समावेश केला आहे. त्यामुळे भविष्यात हा जिल्हा प्रगत जिल्ह्यांच्या पहिल्या रांगेत येईल.

### प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते अडपल्ली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीचे ऑनलाईन पद्धतीने भूमिपूजनही करण्यात आले. या वेळी त्यांनी राष्ट्रपतिपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर महाराष्ट्राचा हा आपला पहिलाच दौरा असून या दौऱ्यादरम्यानचा पहिलाच कार्यक्रम युवा पिढीशी निगडित असणारा दीक्षांत समारंभ असल्याचे सांगितले.

## निवडक

### सीए परीक्षेत अक्षय जैन देशात पहिला

**नवी दिल्ली :** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या सनदी लेखापाल (सीए) परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला असून अहमदाबाद येथील अक्षय जैन हा देशात प्रथम आला आहे. त्याने ८०० पैकी ६१६ गुण प्राप्त केले, तर सीए इंटर परीक्षेत हैदराबाद येथील वाय गोकुळ साई श्रीकर याने ८०० पैकी ६८८ गुण प्राप्त करीत अव्वल क्रमांक मिळवला.

### 'क्विक हील'च्या सीईओपदी विशाल साळवींची नियुक्ती

**मुंबई :** क्विक हील टेक्नोलॉजीज या सायबर सुरक्षितता उत्पादने पुरवणाऱ्या कंपनीने मुख्य कार्यकारी अधिकारीपदी विशाल साळवी यांची नियुक्ती केली आहे. यापूर्वी ते 'इन्फोसिस'मध्ये कार्यरत होते.

### रायगडचे पर्जन्यमान

**२४ तासांतील पाऊस : २२.४ मिमी**
**एकूण पाऊस : ७३०.८ मिमी**

# शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्यात कोकणामध्ये रायगड जिल्हा अव्वल

**अलिबाग : प्रतिनिधी**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना (पीएम किसान) अंतर्गत शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या अनुदानासाठी रायगड जिल्ह्यातील ९३ टक्के शेतकऱ्यांचे ई-केवायसी करण्यात आले आहे. या योजनेसाठी शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्यात कोकणात रायगड जिल्हा अव्वल क्रमांकावर आहे.

केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१९पासून पीएम किसान योजना सुरू केली. सातबारा असलेल्या पात्र शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपये दिले जातात. चार महिन्यांनी एकदा दोन हजार रुपये या प्रमाणे हे अनुदान देण्यात येते. या योजनेचा लाभ मिळविण्यासाठी केंद्र सरकारच्या पोर्टलवर नोंदणी करावी लागते. नोंदणीनंतर ई-केवायसी करावी लागते. खाते आधार संलग्न करावे लागते.




या योजनेचा लाभ जास्तीत जास्त शेतकऱ्यांना व्हावा यासाठी कृषी विभागाने विशेष मोहीम राबवली होती. प्रत्येक तालुक्यात ही मोहीम राबविण्यात आली. रायगड जिल्ह्यात एक लाख १७ हजार ८२१ क्रियाशील शेतकरी आहेत. त्यापैकी एक लाख नऊ हजार ७५४ शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्यात आली आहे. जिल्ह्यात ९३.१५ टक्के शेतकऱ्यांची ई-केवायसी झाली असून ६.८५ टक्के शेतकऱ्यांची करणे बाकी आहे.

शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्यात कोकणात रायगड जिल्हा पहिल्या क्रमांकावर आहे. जिल्ह्यात ९३.१५ टक्के शेतकऱ्यांची ई-केवायसी झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात ८६.६१ टक्के, रत्नागिरी ८५.१५ टक्के, पालघर ८१.८० आणि ठाणे ७८.८१ टक्के अशी ई-केवायसी करण्यात आली आहे.

> प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्याकरिता विशेष मोहीम राबविण्यात आली होती. तरीदेखील अजून काही शेतकऱ्यांची ई-केवायसी झालेली नाही. त्यांच्यापर्यंत पोहचून त्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याचा आमचा प्रयत्न आहे. ज्या शेतकऱ्यांनी ई-केवायसी केलेली नाही त्यांनी ती करून घ्यावी.
>
> **-उज्ज्वला बाणखेले,** जिल्हा अधीक्षक, कृषी विभाग, रायगड

## तीन कामगारांचा आगीत मृत्यू

**सोलापूर : प्रतिनिधी**

सोलापुरातील अक्कलकोट रोड एमआयडीसी परिसरात बुधवारी (दि. ५) एका टेक्स्टाईल कारखान्याला आग लागून तीन जणांचा मृत्यू झाला. गॅसवर स्वयंपाक करीत असताना आगीचा भडका उडून ही घटना घडल्याचा प्राथमिक अंदाज अग्निशमन दलाने व्यक्त करण्यात आला आहे.

मनोज लक्ष्मीधर देहुरी, (वय २०, रा. ओडिशा), आनंद लक्ष्मीनारायण बगदी (वय ३०, रा. पश्चिम बंगाल) सहदेव बुद्धवार बगदी (वय २२, रा. पश्चिम बंगाल) अशी या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या कामगारांची नावे आहेत. रुपम विविंग मिल या कारखान्याच्या तळमजल्यावर मॅन्युफॅक्चरिंग युनिट आहे, तर पहिल्या मजल्यावर कामगारांची राहण्याची सोय होती.

## रायगड जिल्ह्यासाठी आज पावसाचा रेड अलर्ट

**अलिबाग : प्रतिनिधी**

हवामान विभागाकडून ६ जुलै रोजी रायगड जिल्ह्यासाठी पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यातील काही ठिकाणी अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. त्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाकडून सर्व नागरिकांना व यंत्रणांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.



जिल्ह्यातील दरडग्रस्त, पूरप्रवण, खाडीलगत सखल भागात राहणाऱ्या नागरिकांनी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. पुलावरून पाणी वाहत असल्यास धाडसाने वाहने पाण्यातून चालवू नये. मासेमारीसाठी खाडी, तलाव, समुद्रात जाऊ नये. सर्व शासकीय यंत्रणांनी आपल्या विभागांच्या यंत्रसामुग्री मनुष्यबळासह तत्पर ठेवाव्यात. कोणत्याही आपत्कालीन प्रसंगी जवळचे पोलीस ठाणे आणि तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा. त्याचप्रमाणे जिल्हा नियंत्रण कक्षाशी ०२१४१-२२२०९७ या टोल फ्री नंबरवर ११२/१०७७ आणि जिल्हा पोलीस नियंत्रण कक्षाशी ०२१४१-२२८४७३ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवणाऱ्या अभिजित पाटील यांच्यावरही गंडांतर

## हायकोर्टानेही जामीन फेटाळल्याने अटकेची टांगती तलवार






**पनवेल : प्रतिनिधी**

कर्नाळा नागरी सहकारी बँक घोटाळ्याचे सूत्रधार असलेले अध्यक्ष व शेकापचे माजी आमदार विवेक पाटील यांचे चिरंजीव तथा बँकेचे संचालक अभिजित पाटील यांचा अटकपूर्व जामीन अर्ज नुकताच मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळला. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ८१ अंतर्गत वैधानिक लेखापरीक्षक रेकॉर्डवरील सामग्री, प्रथमदर्शनी गुन्ह्याचे स्वरूप आणि गंभीरता लक्षात घेऊन अर्जदारावरील आरोपांची कोठडीत चौकशी आवश्यक आहे. त्यामुळे अटकपूर्व जामीन अर्ज नाकारण्यात येत असल्याचे हायकोर्टाने नमूद केले आहे. परिणामी वडिलांनंतर आता मुलावर अटकेची टांगती तलवार कायम आहे.

पनवेलचे अतिरिक्त जिल्हा न्यायाधीश जयराम वडणे यांनी अभिजित पाटील यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळला होता. त्यानंतर त्यांनी मुंबई उच्च न्यायालयात अटकपूर्व जामीन अर्ज दाखल केला. उच्च न्यायालयात न्या. अमित बोरकर यांनीही त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज फेटाळताना सर्वोच्च न्यायालयातील नरिंदरजीत सिंग सहानी प्रकरण, हिमांशू चंद्रवदन प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने दिलेला निकाल, गुरबक्ष सिंग सिब्बिया व इतर विरुद्ध पंजाब राज्य, निम्मगड्डा प्रसाद विरुद्ध सीबीआय अशा वेगवेगळ्या निकालांचा संदर्भ दिला आहे.

आर्थिक गुन्ह्यांचा वर्ग वेगळा असल्याने जामिनाच्या बाबतीत वेगळ्या पद्धतींचा विचार केला पाहिजे. आरोपीने आर्थिक गुन्ह्यात कट रचणे आणि सार्वजनिक निधीचे केलेले प्रचंड नुकसान लक्षात घेणे आवश्यक आहे. संपूर्ण देशाची अर्थव्यवस्था आणि त्याद्वारे देशाच्या आर्थिक आरोग्याला निर्माण होणारा गंभीर धोका पाहणेही गरजेचे आहे. प्रथमदर्शनी असे दिसते की अर्जदार हा २००८पासून कर्नाळा नागरी सहकारी बँकेचा व्यवस्थापकीय समिती सदस्य आहे. तो अध्यक्षांचा मुलगाही आहे. **(पान २वर..)**




**पनवेल : अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ संलग्न मुंबई युनिव्हर्सिटी अॅण्ड कॉलेज टीचर्स असोसिएशनच्या निवडणुकीसाठी विविध महाविद्यालयांमध्ये बुधवारी मतदान झाले. यानिमित्ताने भाजपचे जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर आणि तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी महात्मा फुले महाविद्यालय येथे भेट दिली. या वेळी विस्तारक अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस व माजी नगरसेवक नितीन पाटील, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, तालुकाध्यक्ष व शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, शहराध्यक्ष रोहित जगताप, देवांशू प्रभाळे, अतुल कळसेकर, शांताराम पाटील आदी उपस्थित होते.**



# जागतिक हितासाठी कुटुंब भावनेने कार्य करा

## केंद्रीय मंत्री डॉ. जितेंद्र सिंह यांचे जी २० देशांना आवाहन

**मुंबई : प्रतिनिधी**

जी २० देशांनी जगासमोरील आव्हानांवर मात करण्यासाठी मतभेदांपलीकडे जाऊन विचार करण्याचे आणि आपण एक कुटुंब आहोत या भावनेने जागतिक कल्याणासाठी कार्य करण्याचे आवाहन केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञानमंत्री (स्वतंत्र कार्यभार) डॉ. जितेंद्र सिंह यांनी केले.

मुंबईत जी २० देशांच्या संशोधन मंत्र्यांच्या बैठकीत स्वागतपर भाषणात ते बोलत होते. आपल्या काळातील गुंतागुंतीच्या आव्हानांना तोंड देण्यासाठी परस्पर सहकार्य आणि ज्ञानाचे आदान-प्रदान यांचे महत्त्व भारत जाणत असल्याचे प्रतिपादन मंत्री डॉ. सिंह यांनी या वेळी केले.



जग हवामान बदल आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास या आव्हानांना तोंड देत असताना, अक्षय ऊर्जा स्त्रोतांचा कार्यक्षमतेने वापर करणे अत्यावश्यक बनले आहे, असे डॉ. सिंह यांनी सांगितले. जी -२० सदस्यांनी निव्वळ शून्य कार्बन उत्सर्जन उद्दिष्टांसाठी वचनबद्ध राहून शाश्वत विकास आणि अक्षय ऊर्जे संदर्भात काम करत राहावे यावर त्यांनी भर दिला. जगात अलिकडच्या वर्षांत सौर आणि पवन ऊर्जा संस्थापित करण्यात भरीव वाढ झाल्याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले. ऊर्जा क्षेत्रात क्रांती घडून ते स्वच्छ, अधिक परवडणारे आणि सर्वांसाठी सुलभ होईल, अशी सामग्री शोधण्यासाठी आणि तयार करण्यासाठी आमचे शास्त्रज्ञ अथक परिश्रम करीत आहेत, असे त्यांनी सांगितले.

जी २० राष्ट्रांनी स्वच्छ ऊर्जास्त्रोतांकडे संक्रमण घडवून आणण्यासाठी तंत्रज्ञान व अभिनवतेच्या शक्तीचा उपयोग केला पाहिजे आणि स्मार्ट ग्रीड, ऊर्जा-कार्यक्षम इमारती व शाश्वत वाहतूक व्यवस्था यासारख्या पर्यावरण नवोन्मेषाला प्रोत्साहन दिले पाहिजे, असे डॉ. सिंह यांनी सांगितले. यामुळे पर्यावरणीय परिणाम साधण्यासोबतच आर्थिक विकासाला चालना मिळून रोजगार निर्मितीसाठी नव्या संधी उपलब्ध होतात.

चक्रीवादळ, त्सुनामी, भूस्खलन, वणवे यांसारख्या विविध नैसर्गिक धोक्यांचा अंदाज वर्तवण्यासाठी आणि निरीक्षण करण्यासाठी जी २० समुदायाकडे प्रगत अंतराळ तंत्रज्ञान असल्याकडे डॉ. सिंह यांनी लक्ष वेधले. या तंत्रज्ञानाची उत्पादने जी २०च्या बाहेरील देशांसाठी सामायिक करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली, जेणेकरून ते अशा आपत्तींशी सामना करू शकतील.

क्वांटम तंत्रज्ञान विकसित करणे, क्वांटम कम्युनिकेशनसंदर्भात शोध, क्रिप्टोग्राफी आणि क्वांटम अल्गोरिदम हे विषय पुढील जी २० संशोधन कार्यक्रमपत्रिकेवर आहेत, असे डॉ. सिंह यांनी प्रतिनिधींना सांगितले. क्वांटम तंत्रज्ञानप्रणीत आर्थिक विकासाला गती देण्यासाठी विज्ञानविषयक आणि औद्योगिक संशोधन आणि विकास वाढवण्याचे आमचे ध्येय आहे, असेही ते म्हणाले. शास्त्रज्ञांनी अनुवंशिकता आणि जैवतंत्रज्ञानामध्ये महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे आणि रोगांच्या अनुवंशिक आधाराचा अभ्यास करणे, वैयक्तिक औषध पद्धती विकसित करणे आणि अनुवंशिक अभियांत्रिकी तंत्र प्रगत करणे यावर शास्त्रज्ञांनी लक्ष केंद्रित केले असल्याचे डॉ. सिंह यांनी नमूद केले.

जग वेगाने डिजिटल परिवर्तन अनुभवत असताना, आपली सायबर-सुरक्षा पायाभूत सुविधा मजबूत करणे आवश्यक आहे, असे त्यांनी सांगितले. महत्त्वाची डिजिटल मालमत्ता आणि डेटाचे संरक्षण करण्यासाठी प्रगत प्रणाली विकसित करणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

आजच्या कसोटीच्या काळात तंत्रज्ञानावर आधारित अनेक स्टार्टअप्सच्या उदयाचे साक्षीदार जग असून या कंपन्यांनी आरोग्यसेवा, वित्त, कृषी आणि शिक्षण यासह विविध क्षेत्रांसाठी कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित उपाय विकसित करण्यात उत्कृष्ट कामगिरी केली असल्याचे डॉ. सिंह यांनी सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा ॲनालिटिक्सच्या एकत्रीकरणामुळे निर्णय प्रक्रिया सुधारण्यात, उत्पादकता वाढविण्यात आणि विविध उद्योगांमध्ये नाविन्यपूर्णता वाढविण्यात मदत झाली आहे, असे ते म्हणाले. डॉ. सिंह यांनी रचनात्मक आणि फलदायी चर्चेसाठी जी २० प्रतिनिधींचे आभार मानले.

### ▮ शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी सर्व जण कटिबद्ध

*डॉ. सिंह यांनी खनिज संसाधने, ऊर्जा आणि सागरी अन्न याबाबत आपल्या महासागर आणि समुद्राच्या अफाट क्षमतेकडे जी २० प्रतिनिधींचे लक्ष वेधले आणि मत्स्यपालन, सागरी संशोधन, किनारपट्टी पर्यटन, अक्षय ऊर्जा निर्मिती यामध्ये शाश्वत पद्धतींना चालना देण्यासाठी सर्वजण कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन केले.*

# ज्यांचा पक्षच 'फूलआऊट' झालाय, त्यांना सारे काही 'डाऊटफूल'!

## भाजपच्या चित्रा वाघ यांचा ठाकरे गटावर निशाणा

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणात रविवारी घडलेल्या राजकीय भूकंपामुळे खळबळ उडाली आहे. शिवसेना ठाकरे गटाच्या पक्षाचे मुखपत्र असलेल्या 'सामना'मधून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये पडलेल्या फूटीवरून भाजपवर निशाणा साधण्यात आला होता. यावर भाजप महिला प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ यांनी प्रतिउत्तर देत संजय राऊत यांच्यावर हल्लाबोल केला आहे.

शिवसेना ठाकरे गटाने 'सामना'च्या अग्रलेखातून ठाकरे गटाने भाजपवर 'एक फुल, दो हाफ' अशा शब्दांत



हल्लाबोल केला आहे. या टीकेला भाजपच्या नेत्या चित्रा वाघ यांनी प्रत्युत्तर दिले आहे. त्यांनी ट्विटमध्ये म्हटले आहे की, ज्यांचा पक्षच फूलआऊट झालाय त्यांना सारे काही डाऊटफूल वाटणे साहजिक आहे. सर्वज्ञानींची खदखद आम्ही समजू शकतो. ये तो ना घर का रहा ना घाट का? अशा शब्दांत चित्रा वाघ यांनी संजय राऊत यांच्यावर निशाणा साधला.

# लाचखोर तलाठीला पोलीस कोठडी

**अलिबाग** : लाचखोरीच्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या अलिबाग तालुक्यातील तलाठी पल्लवी भोईर यांना विशेष सत्र न्यायालयाने दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. सातबारा उताऱ्यावर कायदेशीर वारस नोंद करण्यासाठी त्यांनी पाच हजारांची लाच मागितली होती.

अलिबाग तालुक्यातील लोणारे येथे गट नंबर ४०/१ मध्ये ०-५७-० अशी वडीलोपार्जित मिळकतीवर, वडिलांच्या मृत्यूनंतर या मिळकतीच्या सातबारा उताऱ्यावर कायदेशीर वारस नाव नोंदविण्यासाठी तक्रारदारांनी बामणोली तलाठ्याकडे अर्ज केला होता. या कामासाठी पल्लवी भोईर यांनी पाच हजार रुपयांची मागणी केली होती. याबाबतची तक्रार प्राप्त झाल्यावर लाचलुचपत विभागाने सापळा रचून त्यांना मंगळवारी अटक केली होती.

# नोंदणी कार्यालये अत्याधुनिक करावीत

## मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांची सूचना

**मुंबई : प्रतिनिधी**

महसूल, नोंदणी व मुद्रांक, भूमी अभिलेख विभागामार्फत नागरिकांना सेवा देण्यासाठी जिल्हास्तरावर नोंदणी कार्यालये कार्यरत आहेत. या कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानासह सुसज्ज कार्यालये निर्मित्तीच्या सूचना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

सह्याद्री अतिथीगृह येथे विभागातील प्रलंबित कामासंदर्भात आढावा बैठक आज घेण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी महसूल विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी विभागाने केलेल्या कामांची माहिती दिली. प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार असल्याचेही त्यांनी या वेळी सांगितले.



मंत्री श्री. विखे- पाटील म्हणाले की, नोंदणी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना गतीने सेवा देण्यासाठी कार्यालय सुसज्ज तयार करावे. जिल्हास्तरावर प्रायोगिक तत्वावर ५० नोडल सेंटर तयार करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. जमीन मोजणी करण्यासाठीचे काम जलदगतीने होण्यासाठी आवश्यक तेनुसार भूकरमापकास जी.एन.एस.एस.रोव्हर्स पुरविण्यात यावेत. जमीन मोजणीची प्रलंबित प्रकरणे तीन महिन्यांचा कालबद्ध कार्यक्रम राबवून पूर्ण करावीत. शेती महामंडळाच्या जमिनीबाबात लॉजिस्टीक पार्क, आयटीपार्क, फूड पार्क करण्यासंदर्भातील कार्यवाहीस गती द्यावी.

या बैठकीस जमाबंदी आयुक्त बी. सुधांशू, उपसचिव अजित देशमुख, संतोष गावडे, संजय इंगळे, सहसचिव अतुल कोदे, सह नोंदणी महानिरीक्षक नंदकुमार काटकर, सह जिल्हा निबंधक साहेबराव दुतोंडे, सह संचालक धनंजय खोत आदींसह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# नवी मुंबईत एकाच दिवशी चार अपहरणाच्या घटना

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईतील रबाळे पोलीस ठाणे हद्दीत एकाच दिवशी वेगवेगळ्या घटनेत चार जणाचे अपहरण झाल्या प्रकरणी अनोळखी आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये एका मुलाचा आणि तीन मुलींचा समावेश आहे. हे चौघेही अल्पवयीन असल्याने अपहरणाचा गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास रबाळे पोलीस करीत आहेत.

विनोद वाकोडे यांचा पंधरा वर्षीय मुलगा विपुल हा २ तारखेला सकाळी १० वाजता विठ्ठल क्लासेसमध्ये नियमित शिकवणीसाठी गेला होता, मात्र तो परत आलाच नाही. या बाबत त्याचे वडील विनोद यांनी क्लासेसमध्ये चौकशी केली असता तो आज आलाच नाही अशी माहिती समोर आली. त्यामुळे अज्ञात व्यक्तीने फूस लावून अपहरण केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ऐरोली सेक्टर २ येथे पती, पत्नी तीन मुली आणि एक मुलगा असे कुटुंब राहते. मुलगा व पती हे फळ व्यापारी असून ते नेहमी प्रमाणे सकाळीच बाहेर गेले. तर फिर्यादी या संध्याकाळी साडे पाचच्या सुमारास भाजी आणण्यासाठी घराबाहेर पडल्या, मात्र आपल्यावर त्यांची सोळा वर्षीय मुलगी आढळून आली नाही. त्यांनी त्यांच्या इतर दोन मुलींना विचारणा केली असता बाहेर गेलेली मुलगी वेफर्स आणण्यास गेली आहे असे सांगण्यात आले, मात्र रात्री उशिरा पर्यंत घरी न आल्याने शेवटी अपरात्री या बाबत रबाळे पोलीस ठाण्यात मुलीच्या अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला.




ऐरोली गावात एका किराणा दुकानदाराच्या मुलीचेही अपहरण झाल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. २ तारखेला अपहृत मुलगी आणि तिची आई दोघीही स्वतःच्या किराणा दुकानात आल्या होत्या.

जाताना केवळ आई घरी गेली तर मुलगी रात्री अकरा पर्यंत वडिलांच्या सोबत दुकानातच होती. दुकान बंद करण्याची वेळ होत आल्याने वडिलांनी मुलीस घरी पाठवले व काही वेळाने स्वतः पण घरी निघाले. तेवढ्यात त्यांच्या पत्नीचा फोन आला की मुलगी घरी आलीच नाही. त्यामुळे नातेवाईक, शेजारी, परिचितांकडे तिच्या विषयी चौकशी केली मात्र काहीच शोध न लागल्याने रात्री उशिरा तिच्या अपहरण झाल्या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# महावितरणची सोलर रुफटॉप योजना ग्राहकांसाठी लाभदायक

**भांडूप :** सौर उर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र शासनाने अनेक पाऊले उचलली आहेत. सोलर रुफटॉप योजना ही अत्यंत महत्त्वाकांक्षी योजना असून या योजने अंतर्गत महावितरणच्या ग्राहकांना छतावरील (रुफटॉप) सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा बसविण्यासाठी केंद्र शासनाकडून ४० टक्क्यांपर्यंत अनुदान मिळत आहे.

सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणेमुळे मासिक घरगुती वीजबिलात मोठी बचत होऊन, नेटमिटरिंगद्वारे महावितरणकडून वर्षाअखेर शिल्लक वीजदेखील विकत घेतली जाते. ग्राहकांच्या सोयीसाठी केंद्र शासनाने 'नेशनल पोर्टल फॉर सोलर रुफटॉप'चे अनावरण जुलै २०२२ मध्ये केले असून या पोर्टलवर ग्राहक भारतामधून कुठूनही सोलर रुफटॉपसाठी अर्ज करू शकतात.

रुफटॉप सौर योजनेमधून घरगुती ग्राहकांसाठी अटी व शर्तीसह १ ते ३ किलोवॅटपर्यंत ४० टक्के आणि ३ किलोवॅटपेक्षा अधिक ते १० किलोवॅटपर्यंत २० टक्के अनुदान देण्यात येते तसेच सामुहिक वापरासाठी ५०० किलोवॅटपर्यंत परंतु प्रत्येक घरासाठी १० किलोवॅट मर्यादेसह गृहनिर्माण रहिवासी संस्था व निवासी कल्याणकारी संघटना ग्राहकांना २० टक्के अनुदान देण्यात येते.

महावितरण रुफटॉप सौर ऊर्जा निर्मिती यंत्रणा आस्थापित करण्यासाठी ऑनलाईन अर्जाची सोय महावितरणच्या www.mahadiscom.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, असे आवाहन महावितरण भांडूप परिमंडलाचे मुख्य अभियंता सुनील काकडे यांनी सांगितले.



**महाबळेश्वर : हर घर संपर्क या अभियानाला भाजप महिला उपजिल्हा अध्यक्षा उषा ओंबळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग क्रमांक १ व २ नगरपालिका व मार्केटमध्ये सुरुवात करण्यात आली. सरकारच्या योजनांची माहिती देण्यात आली. या वेळी महाबळेश्वर शहराध्यक्ष राजेंद्र पवार, कामगार संघटनेचे अध्यक्ष सन्नी मोरे, भाजप सदस्य अर्जुन घावरे उपस्थित होते. ९०९०९०२०२४ या नंबरवर मिल्ड कॉल देऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना समर्थन दर्शवावे याकरिता आवाहन या वेळी करण्यात आले.**

# वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात फळांचे वाटप आणि अन्नदान



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पत्रकार महासंघाचे अध्यक्ष तथा साप्ताहिक रायगड शिव सम्राटचे संपादक रत्नाकर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्ताने तालुक्यातील सांगटोळी येथील जनाधर्मा आधारगृहातील वृद्धाश्रमात आजी-आजोबांना फळांचे वाटप, स्नेहभोजन आणि जेवणाचे साहित्य भेट स्वरूपात देण्यात आले.

या कार्यक्रमास पत्रकार महासंघाचे जेष्ठ सल्लागार प्रमोद वालेकर, पत्रकार सुभाष वाघपंजे, के. सी. सिंग, राजेश डांगळे, शंकर वायदंडे, दत्ता मोकल, दिपाली पारसकर, उद्योजक सुचित पाटील, उमेश भोईर, गुड हेल्थ ग्रुपचे जेष्ठ सदस्य पांडुरंग पाटील, सर्जेराव पाटील, आनंद पाटील, नरेश म्हात्रे, दत्तात्रेय पैलकर, राजेंद्र पाटील, शिवतेज मित्र मंडळाचे उपाध्यक्ष विष्णू ठाकूर, संदेश पाटील, दुर्वा पाटील, सुदेश पाटील, भूषण ठाकूर आदी उपस्थित होते.

# सनातन संस्थेतर्फे गुरूपौर्णिमा महोत्सव

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

सनातन संस्थेच्या वतीने रायगड जिल्ह्यात नवीन पनवेल, रसायनी, अलिबाग, उरण आणि कर्जतमध्ये येथेही तसेच देशभरात ७२ ठिकाणी गुरूपौर्णिमा महोत्सव उत्साहात झाले. कामोठे येथील कराडी समाज सभागृहात झालेल्या कायक्रमात हिंदु जनजागृती समितीचे प्रवक्ते डॉ. उदय धुरी यांनी मार्गदर्शन केले. या वेळी गौरव क्लासेस संचालक संतोष वर्तक यांनीही मार्गदर्शन केले.

रामनाथ येथे झालेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवात सामाजिक कार्यकर्ते आणि हिंदुत्वनिष्ठ डॉ. रोहिदास शेळके मार्गदर्शन करताना म्हणाले, गुरु-शिष्य परंपरा म्हणजे आपल्या धर्माने आपल्याला दिलेली अनमोल देणगी आहे. हिंदु धर्मातील रामायण, महाभारत यांतील केवळ एका ग्रंथाचा अभ्यास करून त्यानुसार आचरण केले, तरी आपण ईश्वरप्राप्ती करू शकतो, इतके हिंदु धर्माचे महत्त्व आहे'.

पनवेल येथे झालेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवात श्वेतांबर मूर्तीपूजक जैन संघाचे अध्यक्ष आणि महाराष्ट्र मंदिर महासंघाचे सदस्य मोतीलाल जैन, रसायनी येथे झालेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवात ह.भ.प. सुरेश महाराज पाटील, उरण येथे झालेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवात वारकरी संप्रदायाचे ह.भ.प. कर्वे गुरुजी आणि हिंदु जनजागृती समितीचे राजेंद्र पावसकर, कर्जत येथील कडवं गणपती मंदिराचे विश्वस्त विनायक उपाध्याय तर रामनाथ येथील गुरुपौर्णिमा महोत्सवात सनातन संस्थेच्या विशाखा आठवले या वक्त्यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले.

महोत्सवाच्या प्रारंभी श्री व्यासपूजा आणि प.पू. भक्तराज महाराज यांचे प्रतिमापूजन करण्यात आले. ठिकठिकाणी झालेल्या गुरुपौर्णिमा महोत्सवांतविविध मान्यवरांसह मोठ्या संख्येने जिज्ञासू उपस्थित होते.




### सहा भाषांमध्ये ऑनलाईन कार्यक्रम

***यंदाच्या वर्षी सनातन संस्थेच्या वतीने मराठी, इंग्रजी, कन्नड, तमिळ, मल्याळम आणि तेलुगु या सहा भाषांमध्ये ऑनलाईन गुरुपौर्णिमा महोत्सवही संपन्न झाले. या माध्यमांतून देश-विदेशांतील भाविकांनी 'गुरुपौर्णिमा महोत्सवां'चा लाभ घेतला. या वेळी सनातन संस्थेच्या मराठी भाषेतील 'अध्यात्माचे प्रास्ताविक' या ई-बुकचे प्रकाशन करण्यात आले.***

संस्थेच्या वतीने नवीन पनवेल येथील गुरुपौर्णिमा महोत्सवात 'स्वसंरक्षण प्रात्यक्षिके' सुद्धा दाखवण्यात आली.

पान १ वरून

## वडिलांच्या पावलावर पाऊल ठेवणाऱ्या अभिजित पाटील यांच्यावरही गंडांतर

प्रथमदर्शनी अर्जदाराने कार्यवाही पुस्तकावर आणि ज्या बैठकांमध्ये बोगस कर्जे मंजूर झाली, त्या ठरावावर स्वाक्षरी केली आहे. कर्नाळा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.चे करण्यात आलेले फॉरेन्सिक ऑडिट विविध रक्कम चालू खात्यात हस्तांतरित करण्यात आल्याचे दर्शवते.

कर्नाळा इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.चा चालू खाते क्रमांक क्र. २७१३मध्ये चार कोटी ५० लाखांचे हस्तांतरण वेदांत ट्रान्सपोर्ट सर्व्हिसेसचे कर्ज खाते क्रमांक ५५मध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथमदर्शनी हे दिसून येते की, विविध रकमा अर्जदाराच्या खात्यात हस्तांतरित केल्या जात होत्या. अर्जदारावरील आणखी एक आरोप म्हणजे पावती.

बोगस सी.सी. कर्ज खाते क्र. ८१, जे ओम ईश्वरी एंटरप्रायझेसच्या नावे दिसते. त्यामधून विविध रक्कम हस्तांतरित करण्यात आली आहे. आस्वाद पेट्रोलियम कर्नाळा यांच्या कर्ज खात्यामध्येही तशी रक्कमही होती. अपेक्सच्या ओव्हरड्राफ्ट (ओडी) कर्ज खाते क्रमांक १२मधून हस्तांतरित करण्यात आली आहे. अर्जदाराने वैयक्तिक खात्यात रोख रक्कम जमा केली होती. अर्जदार असे व्यवहार माहीत नाहीत असे सांगतो, मात्र रेकॉर्डमधील रकमेची पावती सत्य परिस्थिती दर्शवते.

तपास यंत्रणेकडे उपलब्ध असलेली सामग्री व फॉरेन्सिक ऑडिट रिपोर्ट, जे प्रथमदर्शनी दाखवते बोगस ओडी कर्ज खात्यांमधून विविध बँकेत निधी अर्जदाराची खाती वर्ग करण्यात आला आहे. व्हाईट कॉलर गुन्ह्यांमुळे देशाच्या आर्थिक रचनेवर परिणाम झाला आहे, ज्याचा देशाच्या विकासावर गंभीर परिणाम होतो. इतक्या मोठ्या प्रकरणात अटकपूर्व जामीन मंजूर केल्यास केसवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आहे. न्यायव्यवस्थेवर समाजाचा विश्वास राहणार नाही. तपास अद्याप प्रगतिपथावर असल्याने संशयित व्यक्तीचा प्रचंड फायदा होऊ शकतो. अनेक उपयुक्त माहिती नष्ट केल्या जाऊ शकतात. खटल्यातील वस्तुस्थिती लक्षात घेता असे दिसून येते की, प्रथम माहिती अहवाल (एफआयआर) शिफारशीवर आधारित आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०च्या कलम ८१ अंतर्गत वैधानिक लेखापरीक्षक, रेकॉर्डवरील सामग्री, प्रथमदर्शनी, गुन्ह्याचे स्वरूप आणि गंभीरता लक्षात घेऊन अर्जदारावरील आरोपांची कोठडीत चौकशी आवश्यक आहे. त्यामुळेच अटकपूर्व जामीन अर्ज नाकारण्यात आला आहे.

# चोरी, फसवणुकीच्या घटनांमध्ये वाढ

## खारघरमध्ये दोन ठिकाणी चैन स्नॅचिंगच्या घटना

**पनवेल : वार्ताहर**

चैन स्नॅचिंग करणाऱ्या लुटारूंनी खारघरमध्ये अवघ्या दहा मिनिटांमध्ये दोघांच्या अंगावरील सुमारे ९२ हजार रुपये किंमतीचे दागिने लुटून पलायन केल्याची घटना घडली आहे. खारघर पोलिसांनी या लुटारुंविरोधात जबरी चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

खारघर सेक्टर ७ मध्ये राहणाऱ्या विमल झरेकर (वय ६५) या दरदिवशी सायंकाळी खारघरमध्ये वॉकींगसाठी जातात. नेहमीप्रमाणे विमल झरेकर आपल्या सोसायटी लगतच्या गार्डनमधून वॉकींगकरून घरी परतत असताना समोरुन मोटरसायकलवरून आलेल्या दोघा लुटारुंनी त्यांच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचले. या वेळी ३७ हजार रुपये किमतीचे अर्धे मंगळसूत्र लुटारुंच्या हाती लागले, तर उर्वरित मंगळसूत्र विमल झरेकर यांच्याकडे राहिले. या वेळी विमल झरेकर यांनी आरडा-ओरड केली, मात्र, तोपर्यंत दोघे लुटारु झामा स्वीटस चौकाच्या दिशेने पळून गेले.

यानंतर काही वेळातच सदर लुटारूंनी खारघर सेक्टर २७ मध्ये राहणाऱ्या आणि सेक्टर २१ मधील ग्रामविकास भवन समोरील रस्त्याने पायी चालत जाणाऱ्या हर्ष मनोज डिंग्रा (वय १९) या तरुणाच्या गळ्यातील ८ ग्रॅम वजनाचे ५५ हजार रुपये किंमतीची सोन्याची चेन खेचून पलायन केले.

या घटनेत दागिने लुटले गेलेले विमल झरेकर आणि हर्ष डिंग्रा दोघेही काही अंतराने खारघर पोलीस ठाण्यात तक्रार तक्रार देण्यासाठी पोहोचले. या दोघांचे दागिने लुटणारे आरोपी एकच असल्याने या प्रकरणात गुन्हा दाखल करुन तपासाला सुरुवात केली आहे.

## वेल्डिंग व्यावसायिकाला ५५ हजारांचा गंडा

**खारघर : प्रतिनिधी**

नोटबंदी आणि कोविड काळापासून सायबर क्राईम मध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. विशेषतः मेट्रोसिटी मध्ये सायबर गुन्हेगारी वाढली असून वेळोवेळी याचे उदाहरण पहावयास मिळत आहेत. खारघरमध्ये वेल्डिंग व्यावसायिकाला ५५ हजारांचा गंडा लावल्याची घटना समोर आली आहे.

खारघर मधील मुर्बी गावातील रहिवासी असलेले जनार्धन म्हात्रे यांचा वेल्डिंगचा व्यवसाय आहे. त्यांना लोखंडी गेट बसविण्याच्या नावाने एका व्यक्तीचा ७६७५०४५५३७ या नंबरवरून फोन आला. याचदरम्यान काही वेळात ६२६५९०८८४१ या नंबरवरून फोन आला बोलता बोलता म्हात्रे यांना त्यांच्याबाबत खासगी माहिती विचारून म्हात्रे यांच्याकडून गुगल पे चा नंबर घेण्यात आला.

या वेळी तीन वेळा समोरच्या माणसाला म्हात्रे यांनी ५५ हजार रुपये गुगल पे द्वारे पाठवले. त्यानंतर समोरील व्यक्तीचा फोन लागला नसल्याने जनार्धन म्हात्रे यांना आपली फसवणुक झाली असल्याचे लक्षात आले. याबाबत म्हात्रे यांनी खारघर पोलीस ठाणे आणि सायबर क्राईम विभाग नवी मुंबईत तक्रार दाखल केली आहे. जनार्धन म्हात्रे सारख्या अनेक जणांची फसवणूक दररोज होत आहे, मात्र बहुतांशी नागरिक तक्रार देण्यास पुढे धजावत नाहीत. या सायबर चोरांना आळा घालण्याचे आवाहन पोलिसांसमोर आहे.

## रिफंडच्या नादात दाम्पत्याने गमावले सव्वा दोन लाख रुपये

**पनवेल : वार्ताहर**

रिफंड अमाऊंट परत न करता पती-पत्नीच्या खात्यामधून दोन लाख २७ हजार डेबिट करून फसवणूक केल्याप्रकरणी अनोळखी व्यक्तीविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रिटघर येथे राहणाऱ्या विना प्रियोळकर यांचे पती रायू प्रियोळकर हे सेंट्रल रेल्वे मुंबई येथे नोकरी करतात. त्यांनी जिओ मार्ट वर ग्राइंडर खरेदी केले होते. ग्राइंडरचे सर्व पार्ट्स आले नसल्याने त्यांनी ग्राइंडर रद्द करून परत रिफंड मिळण्याची रिक्वेस्ट पाठवली, मात्र ग्राइंडर परत घेण्यास व पैसे परत देण्यास कोणी आले नाही. त्यामुळे त्यांनी गुगलवर कस्टमर केअरचा नंबर सर्च केला. त्यावेळी कॉल केला असता तुषार सिंघम नावाचा व्यक्ती बोलत असल्याचे सांगितले.

या वेळी त्या इस्माने गुगल पे चालू करण्यास सांगितले व एनी डेस्क अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यावेळी मोबाईल क्रमांकाचे पहिले पाच अंक टाकण्यास सांगितले. तरीही पैसे परत आले नाहीत. त्यांनी दुसऱ्या दिवशी पुन्हा कॉल करून पैसे आले नसल्याचे सांगितले. या वेळी त्यांनी दुसरा खाते क्रमांक मागितला. त्यांनी पतीचा खाते क्रमांक संलग्न असलेला मोबाईल नंबर दिला. पती यांच्या मोबाईलवरदेखील एनी डेस्क अ‍ॅप डाऊनलोड करण्यास सांगितले. व प्रोसिजर करण्यास सांगितली. त्यांनी मोबाईल क्रमांकाचे शेवटचे पाच अंक गुगल पे वर टाकण्यास सांगितले असता त्यांनी ते टाकले.

या वेळी पतीच्या खात्यातून ९७ हजार ३४ रुपये डेबिट झाले. फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर थोड्या वेळाने ९८ हजार ३३९ आणि ३१ हजार ९९७ रुपये डेबिट झाले. जिओ मार्ट ची रिफंड करणाऱ्या कस्टमर केअर मधून बोलणाऱ्या व्यक्तीने दोन लाख २७ हजार ३७० रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी आरोपीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

# करंजाडे येथील शाळेत विद्यार्थ्यांना मोफत वह्यावाटप

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचा उपक्रम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने रायगड जिल्हा परिषदेच्या करंजाडे येथील शाळेत गरजू विद्यार्थ्यांना भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष तथा मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वह्यांचे वाटप करण्यात आले.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मंडळाचे अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून विविध शैक्षणिक उपक्रम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत मंडळाच्या वतीने करंजाडे येथील रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत वह्या वाटपचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या वेळी भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून वह्यांचे वाटप केले.

या वाटपावेळी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष कर्णा शेलार, पंचायत समितीचे माजी सदस्य भुपेंद्र पाटील, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, सदस्य आतिश साबळे, बळीराम म्हात्रे, नाथाभाई भरवाडा यांच्यासह पदाधिकारी, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.



**पनवेल : करंजाडे परिसरात भाजपचे तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वृक्षारोपण करून झाडे लावा झाडे जगवा हा संदेश देण्यात आला. या वेळी पं. स.चे माजी सदस्य भूपेंद्र पाटील, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, उपसरपंच सागर आंग्रे, सदस्य आतिष साबळे, बळीराम म्हात्रे, नाथाभाई भरवाडा आदी उपस्थित होते.**

## भाजपच्या मनोहर म्हात्रे यांच्यातर्फे छत्रीवाटप





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेच्या जीवन शिक्षण विद्यामंदिर प्राथमिक शाळा क्रमांक ०५, मोठा खांदा या ठिकाणी शाळकरी विद्यार्थ्यांना श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळामार्फत मोफत वह्यावाटप तसेच माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे यांच्या सौजन्याने मोफत छत्रीवाटपाचा कार्यक्रम झाला.

या कार्यक्रमावेळी माजी नगरसेवक महेंद्र कावळे, भाजप युवा मोर्चा उपाध्यक्ष सतीश पाटील, भीमराव पोवार, परेश पाटील, सुरेश कावळे, गुरुनाथ दुंद्रेकर, किशोर पेटकर, विनायक म्हात्रे, कांताराम म्हात्रे, विनय पाटील, अनिकेत भोईर, मुख्याध्यापिका सौ. आव्हाड, शिक्षकवृंद आदी उपस्थित होते. याबद्दल शिक्षक व विद्यार्थ्यांनी आभार मानले.

# चिखलेच्या उपसरपंचपदी भाजपचे सुर्यकांत पाटील



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिखले ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे सुर्यकांत पाटील यांची निवड लागली आहे. त्याबद्दल त्यांचे भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले तसेच पुढील वाटचालीकरीता सदीच्छा दिल्या.

पनवेल तालुक्यातील चिखले ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदाची निवडणूक बुधवारी (दि. ५) झाली. यानिवडणुकीत भाजपचे सुर्यकांत पाटील यांची बिनविरोध निवड झाली. त्याबद्दल सुर्यकांत पाटील यांचे अरुणशेठ भगत यांनी पुष्पगुच्छ देत अभिनंदन केले.

या वेळी भाजपचे तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भुपेंद्र पाटील, पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, रवी शेळके, तंटा मुक्ती अध्यक्ष हिरामण पाटील, सरपंच नामदेव पाटील, सदस्य रमेश गडकरी, रवींद्र गडकरी, विनायक पाटील, सुरेखा पाटील, निकीता पाटील, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य राम फडके, रवींद्र मेढेकर, भालचंद्र पाटील, मच्छिंद्रनाथ पाटील, योगेश पाटील, दत्तात्रेय म्हात्रे, भगवान पाटील, शांताराम कडव, अजय तेजे, रिहान पाटील यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते. दरम्यान, उपसरपंचपदी सुर्यकांत पाटील यांनी निवड झाल्यानंतर त्यांच्या समर्तकांनी जल्लोष साजरा केला.

## निवडक

### तलावात बुडून मुलाचा मृत्यू

**पनवेल :** तालुक्यातील कोळवाडी येथील तलावात आर्यन संजय भालेराव (वय १४) या मुलाचा बुडून मृत्यू झाला आहे. या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. कोळवाडी येथील आर्यन संजय भालेराव हा मावशी त्याच्या मुलगा अश्विन मोरे आणि प्रदीप थापा यांच्यासोबत पोहण्यासाठी गावाजवळील तळ्यात गेले होते. या वेळी पाण्यात बुडून आर्यन याचा मृत्यू झाला. या घटनेची नोंद तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

### रूपाली सपकाळची पीएसआयपदी निवड

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयाची रूपाली सोनू सपकाळ या विद्यार्थिनीची



एमपीएससीद्वारे झालेल्या परीक्षेतून पीएसआयपदी निवड झाली आहे. विशेष म्हणजे महिला प्रवर्गातून ती महाराष्ट्र राज्यात प्रथम आली आहे. उरण महाविद्यालयाची ती इतिहास विषयाची पदवीधर विद्यार्थिनी आहे. तिच्या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. तिच्या या यशामध्ये तिचे आई-वडील, मामा व शिक्षकांचे मार्गदर्शन, प्रेरणा व प्रोत्साहन महत्त्वाचे ठरले, असे तिने सांगितले.



**पनवेल : लायन्स डिस्ट्रिक्ट ३२३१ -३ तर्फे नुकत्याच झालेल्या पुरस्कार सोहळ्यात लायन्स क्लब ऑफ पनवेल सरगमचा सन्मान प्रांतपाल मुकेश तनेजा यांच्या हस्ते करण्यात आला. सरगम क्लब अध्यक्ष स्वाती गोडसे, मानदा पंडित, अ‍ॅड. सुनील देशपांडे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.**

## कामोठ्यातील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात

**कामोठे : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते दि. बा. पाटील विद्यालय कामोठेमध्ये गुरूपौर्णिमा साजरी करण्यात आली. विद्यालयातील इयत्ता दहावीच्या अ तुकडीतील विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचे नियोजन केले.

महर्षी व्यास तसेच रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. विद्यालयातील सर्व सेवक वृंद यांना फुल पुष्प व छोटीशी भेट देऊन विद्यार्थ्यांमार्फत त्यांचा सन्मान करण्यात आला. विद्यार्थी मनोगतामध्ये पल्लवी मगर या विद्यार्थिनींने शालेय जीवनात शिक्षक यांचे महत्त्व सांगितले. शिक्षक मनोगतामध्ये डी. जी. खुटले यांनी भारतामधील गुरु शिष्य परंपरा सांगून



आपल्या जीवनात गुरुचे महत्त्व किती आहे हे विविध उदाहरणांमधून सांगितले.

विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. चाळके यांनी आपल्या मनोगतात यशस्वी होण्यासाठी गुरुचे मार्गदर्शन किती महत्त्वाचे असते हे सांगितले. या कार्यक्रमाचे निवेदन रिया सुरवाडे या विद्यार्थिनीने केले. या कार्यक्रमाचे आयोजन विद्यालयातील शिक्षिका व्ही. व्ही. फडतरे व सांस्कृतिक विभाग प्रमुख ए. पी. पाटील यांनी केले.

# अनधिकृत टपऱ्यांवर कारवाई

**पनवेल : वार्ताहर**

नवीन पनवेल व कळंबोलीमधील फूटपाथवरती उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपाऱ्यांवरती आयुक्त गणेश देशमुख यांच्या सूचनेनूसार बुधवारी (दि. ५) महापालिकेच्या वतीने कारवाई करण्यात आली.



गेल्या काही दिवसांपासून प्रभाग ब अंतर्गत असलेल्या कळंबोली व नवीन पनवेल या भागांमध्ये रात्रीतून फूटपाथवरती अनधिकृत टपऱ्या उभारल्या जात होत्या. अखेर आयुक्तांनी दिलेल्या सूचनेनूसार उपायुक्त कैलास गावडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभाग अधिकारी सदाशिव कवठे यांनी अतिक्रमण विभागांतर्गत या दोन्ही ठिकाणांवरील पाच टपऱ्यांवरती कारवाई केली.

रात्रीतून फूटपाथवरती अनधिकृतपणे टपऱ्या उभारल्या जात असल्याने नागरिकांना चालण्यासाठी त्रास होत असल्याच्या तक्रारी वारंवार महापालिकेकडे येत होत्या. अखेर जेसीबीच्या साहाय्याने या अनधिकृत टपाऱ्या पाडण्यात आल्या व टपऱ्यांचे सर्व साहित्य जप्त करण्यात आले.

# पनवेल स्टँडवरील विक्रेत्यांचा पोलिसांकडून सत्कार

**पनवेल : प्रतिनिधी**

चोर पकडून दिल्याबद्दल पनवेलचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितिन ठाकरे यांनी या विक्रेत्यांना पोलीस ठाण्यात बोलावून चांगले काम केल्याबद्दल त्यांचा सत्कार केला.

एसटी स्टँडवरील विक्रेत्यांकडे नेहमीच संशयाने पहिले जाते, पण पनवेल स्थानकात मात्र हे विक्रेते नेहमी पाकीटमार आणि महिलांची छेड काढणाऱ्यांपासून प्रवाशांचे रक्षण करीत असल्याने त्यांना प्रवासी आपले रक्षण करणारे देवदूत समजतात. पाकीटमार महिलेला पकडून दिलेल्याबद्दल त्यांचे खास कौतुक करून शुक्रवारी शहर पोलीस ठाण्यात त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी विक्रेता अशोक शांताराम कोळी यांनी सांगितले की, साहेब, आम्ही गरीब आहोत पण दिवसभर कष्ट करून खातो. आमच्याबद्दल अनेकांच्या मनात शंका असते. त्यामुळे स्टँडवर कोणाची संशयास्पद हालचाल दिसल्यास आम्ही सावध होतो. शुक्रवारी एक महिला गाडीची वाट पाहत होती तिच्या मागे ही महिला अर्धा तास फिरत होती. त्यामुळे मला संशय आला. मुरूड गाडीजवळ गर्दीत पर्समध्ये



हात घालून पैसे काढत असताना तिचा मी व्हिडीओ काढला. आमच्यापैकी एकाने तिचा हात पकडल्यावर तिने पर्स टाकून दिली. आम्ही तिला पकडून आगार व्यवस्थापकांच्या कार्यालयात आणून पोलिसांना बोलावले.

वरिष्ठ निरीक्षक नितीन ठाकरे म्हणाले की, पनवेल स्टँडवरील विक्रेत्यांच्या सतर्कतेमुळे पर्स पळवणाऱ्या महिलेला पकडता आले. या प्रमाणे सर्व नागरिकांनी सहकार्य केल्यास पोलिसांचे काम सोपे होईल. गुन्हेगारांच्या मनात भीती निर्माण होईल.

त्यामुळे चोरी, पाकीटमारीचे गुन्हे कमी होतील, म्हणूनच या विक्रेत्यांचा सत्कार करून आम्ही त्यांचा पाठीवर कौतुकाची थाप दिली आहे.

> **एसटी बसस्थानकात हे परवानाधारक विक्रेते धंदा करतानाच पाकीटमार, अवैध वाहतूक आणि महिलांची छेड करणाऱ्यांना पकडून देण्यासाठी नेहमी सहकार्य करतात. कचरा टाकणाऱ्या प्रवाशांनाही कचरा पेटीत टाकण्यास सांगतात. हेच आमच्यासाठी मोठे आहे. पनवेल स्थानकात आज अधिकृत परवाना असलेले ११ विक्रेते आहेत.**
> **-सुजीत डोळस, आगार प्रमुख**

## संपादकीय

# लोकांचे सहकार्य हवे

भारतात रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण इतके प्रचंड का आहे, या प्रश्नाचे अर्धेअधिक उत्तर देशातील अलीकडच्या तीन मोठ्या रस्तेअपघातांच्या तपशीलांत मिळून जाते. काहीही घडले की सरकारकडे बोट दाखवायचे हा विरोधीपक्षांच्या दैनंदिन कामकाजाचा भाग आहे, परंतु एकीकडे देशातील महामार्गांचे जाळे कैकपटींनी विस्तारत असताना अपघातांचे प्रमाण आटोक्यात येत नसेल तर या अपघातांच्या तपशीलांत जाऊन पहावे लागेल व त्यांच्या मुळाशी असलेल्या कारणांवर उपाययोजना करावी लागेल.

**समृद्धी महामार्गावरील दुर्दैवी अपघाताची घटना ताजी असतानाच धुळे जिल्ह्यात मंगळवारी सकाळी भरधाव कंटेनरच्या धडकेत दहा जणांचा जागीच मृत्यू झाला व १९ जण जखमी झाले. ब्रेक फेल होऊन चालकाचा ताबा सुटल्याने हा कंटेनर एक कार व अनेक दुचाकींना धडक देत रस्त्याकडेच्या हॉटेलमध्ये शिरला तसेच शेजारच्या बसथांब्यावर जाऊन धडकला. या भीषण अपघातात पाच पुरुष, दोन महिला व तीन विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला. ज्या दिवशी महाराष्ट्रात हा अपघात झाला, त्याच २४ तासांत उत्तर प्रदेश आणि तेलंगणा या राज्यांतही भीषण अपघातांची नोंद झाली. उत्तर प्रदेशात आग्रा जिल्ह्यात सोमवारी रात्री एका भरधाव मोटारीने प्रमाणाबाहेर प्रवासी कोंबलेल्या ऑटोरिक्शाला धडक दिल्याने सहा जण ठार झाले तर तीन जण गंभीर जखमी झाले. मोटारचालकाने मद्यप्राशन केल्याचे तपासात उघडकीस आले आहे. तिसऱ्या अपघातात हैदराबादमध्ये मॉर्निंग वॉकला निघालेल्या तिघी जणींना एका भरधाव मोटारीने पाठीमागून जोरदार धडक दिली. एक १९ वर्षांचा तरुण ही मोटार भीषण वेगाने चालवत होता. गेल्या नऊ वर्षांत देशातील राष्ट्रीय महामार्गांची एकूण लांबी सुमारे ५९ टक्क्यांनी वाढली आहे. या वाढीमुळे भारताकडे आता अमेरिकेनंतर दुसऱ्या क्रमांकाचे सर्वांत मोठे रस्ते जाळे झाल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी अलीकडेच सांगितले होते. शाश्वत भविष्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याने पुढील पाच वर्षांमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवणे, स्वच्छ ऊर्जेला चालना देणे आणि कार्बन उत्सर्जन कमी करणे यावर भर देणार असल्याचेही ते नेहमी सांगतात, मात्र रस्ते अपघात कमी करण्याच्या संदर्भात झालेल्या कामाबाबत आपण फारसे समाधानी नसल्याची खंतही गडकरी आवर्जून व्यक्त करतात. मानवी वर्तणूक हा अपघात कमी करण्यातील महत्त्वाचा घटक असून मानवी वर्तणुकीत बदल घडून आल्याखेरीज रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी होणार नाही व लोकांच्या सहकार्याशिवाय हे शक्यही नाही याची कबुली त्यांनी यापूर्वी अनेकदा दिली आहे. स्वयंसेवी व सामाजिक संघटना, विद्यापीठे, महाविद्यालये, शाळा यांच्यामार्फत मोठी मोहीम चालवून यासंदर्भात लोकांचे सहकार्य मिळवण्याचा प्रयत्न परोपरीने सुरू आहे. नेमके कुठे हवे आहे लोकांचे सहकार्य? आपल्याकडील अपघातांची कारणमीमांसा करताना नेहमी जाणवते की आपली बेशिस्त आणि बेदरकार वृत्ती त्यापैकी बहुतेक अपघातांस कारणीभूत असते. अपघातांमागे यांत्रिक दोष कमी प्रमाणात दिसतात व मानवी चुकीचे प्रमाण त्यापेक्षा कितीतरी अधिक असते. भारतात रस्ते अपघातांत दरवर्षी साधारणपणे दीड लाख लोक आपला जीव गमावतात. हे प्रमाण जगातील ज्या-ज्या देशांमध्ये कमी आहे, तिथे अपघात होऊच नयेत यासाठी उत्तम खबरदारी घेतली जाते. नियम हे आपल्या सुरक्षेसाठी आहेत याची भावना तेथील नागरिकांमध्ये नीट रुजलेली दिसते. आपल्याकडेही ही भावना रुजवण्यावर आता भर दिला जायला हवा.**

# पोलादपुरात पंचायत समितीची आमसभा व्हावी!

**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील जनतेचे हक्काचे व्यासपीठ असलेल्या पोलादपूर तालुका पंचायत समितीच्या आमसभेवर अघोषित बंदी आली आहे. कोरोना काळापूर्वीच ही आमसभेची प्रथा बंद झाली आणि जनतेला स्वत:चे प्रश्न मांडण्यासाठी पत्रकारांकडे, अधिकाऱ्यांकडे जाण्याची गरज भासू लागली. काम न करणाऱ्या पत्रकार व अधिकाऱ्यांकडून या जनतेची हेटाळणी झाली आणि काम करणाऱ्या पत्रकार-अधिकाऱ्यांवर या समस्यांना वाचा फोडण्याची जबाबदारी वाढली.



पोलादपूर तालुका पंचायत समितीच्या वार्षिक कामकाजाबाबतचा आढावा घेण्यासाठी महाड-पोलादपूर व माणगांव विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली आमसभेचे आयोजन सोमवार १९ नोव्हेंबर २०१२ रोजी येथील कॅप्टन विक्रमराव मोरे सभागृहामध्ये आयोजित करण्यात आली. ही आमसभा ऑगस्ट महिन्यात ग्रा. पं. निवडणुकीपूर्वी जाहिर होण्यापूर्वीच आचारसंहितेच्या शक्यतेमुळे पुढे ढकलण्यात आली. नंतर १ ऑक्टोबरला आमसभा घेण्याचे ठरले आणि पुन्हा आचारसंहिता लागू झाल्याने टळली. यानंतर ग्रामपंचायतीच्या निवडणुका पार पडल्या असून २० नोव्हेंबरला आमसभा घेण्याचे ठरले, पण मंगळवारी दुपारी आमसभेच्या सचिवांच्या म्हणजेच गटविकास अधिकारी भारत जगताप यांच्या स्वाक्षरीने तातडीची प्रेसनोट जारी होऊन आमसभा २० नोव्हेंबरऐवजी १९ नोव्हेंबररोजी घेण्याचा निर्णय प्रसिध्दीस देण्याचे ठरले. ठरलेल्या १९ नोव्हेंबर २०१२ रोजी तालुक्यातील पहिला तालुकास्तरिय लोकशाहीदिन आयोजित करण्यात आला असल्याने जनतेने नक्की कुठे जायचे, असा संभ्रम निर्माण झाला आहे.

या आमसभेवेळी तालुक्यातील ज्या नागरिकांना प्रश्न उपस्थित करायचे असतील त्यांनी येत्या १५ नोव्हेंबरपर्यंत पंचायत समिती कार्यालयामध्ये लेखी स्वरूपामध्ये पाठवावेत, असे आवाहन आमसभेचे सचिव तथा गटविकास अधिकारी यांनी केले आहे. यापूर्वी ऑगस्ट महिन्यात आचारसंहितेमुळे पुढे ढकलण्यात आलेली ही आमसभा १ ऑक्टोबररोजी होणार असल्याचे जाहिर झाले, मात्र अवर्षणामुळे पुढे ढकलण्यात आलेला ग्रामपंचायत निवडणुकीचा कार्यक्रम याच दिवशी जाहीर झाल्याने आचारसंहिता पुन्हा लागू होऊन आमसभेला आता चक्क दिवाळीनंतरचा मुहूर्त मिळाला आहे. कालपर्यंत वृत्तपत्रांकडे २० नोव्हेंबरचा मुहूर्त देणाऱ्या पंचायत समिती प्रशासनाने अचानक १९ नोव्हेंबरला आमसभा होणार असल्याचे कळविल्याने आमजनतेत संभ्रम निर्माण झाला आहे. पोलादपूर तहसील कार्यालयामध्ये पहिल्यांदाच तालुकास्तरिय लोकशाही दिनाचे आयोजन सोमवार १९ नोव्हेंबर २०१२ रोजी करण्यात आले असताना पोलादपूर पंचायत समिती प्रशासनास याबद्दल अनभिज्ञता असल्याने ही आमजनतेची चेष्टा करण्याची लहर कोणाला आली, असा प्रश्न जनतेला पडला.

पोलादपूर पंचायत समितीच्या इतिहासात प्रथम सर्वाधिक विलंबाने या आमसभेचे आयोजन होत असून ३१ मार्चला संपणाऱ्या २०११-२०१२ या आर्थिक वर्षाचा आढावा घेण्यासाठी अर्धआर्थिक वर्ष ३० सप्टेंबर २०१२ रोजी संपल्यानंतर ही आमसभा आयोजित होत असल्याने पंचायत राजच्या शिफारसी व मार्गदर्शक तत्वांकडे आयोजनाबाबत दूर्लक्ष झाले आहे. दरवर्षी आमसभेमध्ये पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा घेण्याचे निर्देश पंचायत राजमार्फत करण्यात आले असून केवळ आमसभेच्या सूचनेपुरताच या निर्देशाचा उल्लेख नमूद करण्यात येत आहे, मात्र आमसभेच्या कामकाजावेळी राज्यसरकारच्या विविध खात्यांचा आढावा घेऊन ही आमसभा पंचायत समितीच्या कामकाजापर्यंत पोहोचण्यापूर्वीच संपुष्टात येत असल्याचा अनुभव उपस्थित नागरिकांना घ्यावा लागत आहे.

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना कमर्शियल पध्दतीने वीजबिलांचा आकारणी करण्यात आल्याने शाळांची वीजकनेक्शन थकित बिलांमुळे तोडण्याची वेळ आली आहे; या प्रश्नी राज्य सरकारचे पावसाळी अधिवेशनामध्ये लक्ष वेधून घेऊ, अशी ग्वाही महाड विधानसभा मतदार संघाचे आमदार भरत गोगावले यांनी येथील पंचायत समितीच्या बॅ.नाथ पै सभागृहामध्ये बोलताना दिली. येत्या २३ जून रोजी पोलादपूर पंचायत समितीच्या आमसभेचे आयोजन करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर आमदार भरत गोगावले यांनी प्रथमच ही आढावा बैठक घेतला. या वेळी विविध खात्यांच्या जबाबदार अधिकाऱ्यांना आमसभेत उपस्थित राहण्याचे निर्देश आमदार भरत गोगावले यांनी या वेळी दिले. या वेळी पत्रकारांनी, पंचायत समितीने आमसभेच्या आयोजनाच्या बातमीसोबत इतिवृत्ताची प्रत तसेच आमजनतेला लेखी प्रश्न उपस्थित करण्याचा अवधी दिला नसल्याची बाब निदर्शनास आणून दिली. या वेळी आमदार गोगावले यांनी गटविकास अधिकारी सुधाकर तपकिरे यांना तातडीने तसे प्रसिध्दीपत्रक काढण्याचे आदेश दिले. जनतेने विचारलेल्या इतिवृत्तातील विविध मुद्यांची पूर्तता किती झाली आहे, याबाबत आमदार भरत गोगावले हे माहिती घेत असताना पत्रकारांनी, जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना महावितरणमार्फत देण्यात आलेल्या वीजमीटरला आता कमर्शियल पध्दतीने वीज बिल आकारणी होत असल्याने शाळांना अपुऱ्या सादिलातून ही बिले देणे शक्य होत नाही तसेच प्राथमिक शाळा या कमर्शियल म्हणजे धंदेवाईक कशा ठरू शकतात, अशी या वेळी विचारणा केली. यावर महावितरणचे सहायक अभियंता घंटी यांनी महावितरणच्या निर्देशानुसार सध्या अशी कमर्शियल वीज बिल आकारणी होत असल्याचे स्पष्ट केले.

या वेळी इतिवृत्तातील प्रश्नांची उत्तरे संबंधित खात्यांच्या अधिकाऱ्यांनी दिली. यामुळे पोलादपूरच्या इतिहासात प्रथमच गेल्या आमसभेत विचारलेल्याजनतेच्या प्रश्नांची पूर्तता कितपत झाली याचा आढावा आमसभेपूर्वी घेऊन आ.भरत गोगावले यांनी जनतेच्या हिताचा नवा पायंडा पाडला असल्याचे मत अधिकारी वर्गातही कौतुकाने व्यक्त होत आहे.

पोलादपूर पंचायत समितीच्या वार्षिक कामकाजाचा आढावा घेण्यासाठी २०१७-१८ सालासाठीच्या आमसभेचे आयोजन करण्याचे राहूनच गेले असून पंचायत राज समितीची धावती भेट होऊन राजकीय बडदास्त करण्यात आल्यानेच आता आमसभेची गरज राहिली नसल्याचे मानले जात आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडील परिपत्रक क्रमांक पीआरसी १०७७३९१८(७१०) (३) बारा दि. ९ मे १९७८ नुसार पंचायत राज समितीच्या शिफारसीनुसार पंचायत समितीच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी पोलादपूर पंचायत समितीची दरवर्षी वार्षिक आमसभा आयोजित करण्यात येत असते, मात्र आतापर्यंत सातत्याने पोलादपूर तालुक्यातील पंचायत समितीच्या कामकाजाचा आढावा मागे ठेऊन महावितरण, एस.टी. महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, कृषी विभाग, नोंदणी कार्यालय, भूमिअभिलेख कार्यालय तसेच अन्य राज्यसरकारच्या अखत्यारीतील कार्यालयांच्याच कामकाजाचा आढावा घेतला जात असतो, मात्र यंदा आमसभा आयोजन करण्याऐवजी पंचायत राज समितीची भेट पोलादपूर पंचायत समिती कार्यालयाला झाल्यानंतर पोलादपूरची आमसभा आयोजित करण्याचे गांभिर्यच कोणालाही राहिले नाही.

यापूर्वी, २०११-२०१२ या आर्थिक वर्षाचा आढावा घेण्यासाठी अर्धआर्थिक वर्ष ३० सप्टेंबर २०१२ रोजी संपल्यानंतर १९ नोव्हेंबर २०१२ रोजी पोलादपूर पंचायत समितीच्या इतिहासात प्रथमच सर्वाधिक विलंबाने आमसभेचे आयोजन करण्यात आले होते. यावर्षी मात्र, या विलंबावरही मात करीत २०१८-१९ या वर्षाची आमसभाच आयोजित न करण्याची भूमिका अंमलात आणण्यात आली आहे. यामुळे पंचायत राजच्या शिफारसी व मार्गदर्शक तत्वांकडे आयोजनाबाबत दूर्लक्ष झाले आहे. १० मार्चपासूनच लोकसभा निवडणूकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्याने ३१ मार्चपूर्वी आमसभा आयोजित होण्याची शक्यता पूर्णपणे मावळली असून आमजनतेचे प्रश्न मांडण्याचे व्यासपिठ हिरावल्याची जाणीव ग्रामीण जनतेमध्ये होत आहे. पोलादपूर तालुक्यातील जनतेच्या सर्व समस्यांना वाचा फोडण्यासाठी आमसभेच्या आयोजनाची नितांत आवश्यकता आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# नोकियाचे 'हे' दोन स्वस्त फिचर असलेले फोन्स लॉन्च




नोकीया कंपनीने आपले दोन नवीन फिचर फोन बाजारात लॉन्च केले आहेत. कंपनीने नोकीया110 4G आणि नोकीया 110 2G हे दोन फिचर फोन कॉम्पॅक्ट डिझाईन आणि मॉडर्न फिनिशसह लॉन्च केले आहेत. कंपनीने नोकीया 110 4G आणि नोकीया 110 2G मिडनाईट ब्लू (Midnight blue), आर्क्टिक पर्पल (Arctic purple), चारकोल (Charcoal) आणि क्लाउडी ब्लू (Cloudy Blue) रंगांमध्ये उपलब्ध केले आहेत.


**नोकिया ११० 4G, नोकिया ११० 2G चे फीचर्स**

नोकिया ११० ४जी आणि नोकिया १० २जी या फोनमध्ये HD व्हॉइस कॉल सपोर्ट मिळतो. हे या दोन्ही फोन्समधील खास फिचर आहे. नोकियाचे डिव्हाईस इंटीग्रेटेड UPI पेमेंट फंक्शनसह लॉन्च करण्यात आले आहे. ज्यामुळे वापरकर्ते स्कॅन आणि पे (Scan and Pay) च्या मदतीने डिजिटल व्यवहार करू शकतात.

नोकीया 110 4G आणि नोकीया 110 2G फीचर फोन्स बिल्ट इन रिअर कॅमेरासह लॉन्च केले गेले आहे. तसेच या दोन्हीमध्ये डऊकार्ड स्लॉट देखील देण्यात आला आहे. ज्याद्वारे ३२ जीबी पर्यंत स्टोरेज वाढवता येते. गाणी ऐकण्यासाठी यात म्युझिक प्लेअर आणि वायरलेस FM रेडिओदेखील दिला आहे. त्याशिवाय या फोन्समध्ये स्टोरेजची क्षमता वाढवण्याच्या पर्यायासह ऑटो कॉल रेकॉर्डर दिला आहे. नोकिया 1104G (२०२३) आणि नोकिया 110 2 G मध्ये अनुक्रमे 1450 mAh आणि 1000 mAh क्षमतेची बॅटरी देण्यात आली आहे.

किंमत - कंपनीने नोकिया 110 4G मिडनाईट ब्लू आणि आर्क्टिक पर्पल रंगांमध्ये सादर केला आहे. तर नोकीया 110 2G चारकोल आणि क्लाउडी ब्लू रंगांमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. नोकियाचे हे दोन्ही फोन्स कंपनीच्या अधिकृत वेबसाइटवरून, ऑनलाइन पार्टनर स्टोअर अणि रिटेल स्टोअर्समधून खरेदी करू शकता. नोकीया 110 4G (२०२३) फीचर फोन २,४९९ रुपये तर नोकीया 110 2G (२०२३) हा फिचर फोन भारतात १,६९९ रुपयांना उपलब्ध करून देण्यात आला आहे.

# भारतीय जनसंघाचे संस्थापक डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी



**निमित्त**

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी एक थोर राष्ट्रीय नेते, भारतीय जनसंघाचे संस्थापक अध्यक्ष व शिक्षणतज्ञ. त्यांचा जन्म कलकत्त्यात प्रसिद्ध मुखर्जी घराण्यात झाला. त्यांचे वडील विख्यात न्यायाधीश आणि पुढे कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू आशुतोष मुखर्जी. त्यांच्या आईचे नाव श्रीमती जोगमायादेवी. आज डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांची जयंती आहे. त्यानिमित्त त्यांच्याविषयीचा लेख...

हुशार विद्यार्थी म्हणून त्यांनी कीर्ती मिळविली आणि प्रत्येक परीक्षेत पहिल्या वर्गात पहिला क्रमांक मिळविण्याचा त्यांनी विक्रमच केला. कलकत्ता विद्यापीठातून ते बी. ए. झाले. विद्यार्थिदशेतच त्यांचा विवाह सुधादेवी या मुलीशी झाला. त्यांना दोन मुले व दोन मुली झाल्या. लग्नानंतर त्यांच्या वडिलांचे निधन पुढच्याच वर्षी झाले. तेव्हा त्यांची कलकत्ता विद्यापीठाच्या सीनेटवर निवड झाली होती. त्यानंतर त्यांनी बी. एल. ही पदवी घेऊन इंग्लंडमध्ये कायद्याचा अभ्यास केला व ते बॅरिस्टर झाले. लंडनहून परत आल्यावर त्यांनी वकिली सुरू केली. ते बंगाल कायदेमंडळावर निवडून आले, पण वर्षभराने गांधीजींच्या देशव्यापी कायदेभंग आंदोलनाला पाठिंबा व्यक्त करण्यासाठी त्यांनी कायदेमंडळाचा राजीनामा दिला. या वेळी काँग्रेसच्या एकूण धोरणाविषयी ते नाराज होते. परिणामतः ते हिंदुमहासभेकडे वळले. ते कलकत्ता विद्यापीठाचे उपकुलगुरू झाले. त्यांच्या पत्नी सुधादेवी निवर्तल्या. त्यानंतर अखेरपर्यंत त्यांनी दुसरा विवाह केला नाही. हिंदुमहासभेतर्फे ते १९३७ मध्ये बंगालच्या कायदेमंडळावर पुन्हा निवडून आले.

मुस्लिम लीगच्या १९४०च्या लाहोर ठरावानंतर त्यांनी फाळणीविरुद्ध देशभर प्रचार केला. त्या आधी काही काळ ते हिंदूमहासभेचे हंगामी अध्यक्षही होते. लीग मंत्रिमंडळाच्या पराभवानंतर ते बंगालच्या फझलुल हक मंत्रिमंडळात सामील झाले पण भारत छोडो आंदोलनाचे वेळी त्यांनी गांधीजी व इतर काँग्रेस नेत्यांची सुटका आणि संभाव्य जपानी आक्रमणाला तोंड देण्यासाठी राष्ट्रीय सुरक्षादलाच्या स्थापनेची मागणी केली. या प्रश्नांवर तड लावण्यासाठी नंतर त्यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. १९४३च्या बंगालच्या भीषण दुष्काळात श्यामा प्रसादांनी दुष्काळनिवारण्यासाठी खूप कष्ट घेतले. १९४७च्या सुरुवातीस देशाची फाळणी होणार असे दिसू लागल्यावर त्यांनी बंगालच्याही फाळणीचा आग्रह धरला.

भारत स्वतंत्र झाल्यावर पंडित नेहरुच्या पहिल्या केंद्रीय मंत्रिमंडळात ते उद्योग आणि पुरवठा मंत्री झाले. त्या आधीच हिंदुमहासभेमध्ये अहिंदूनांही प्रवेश द्यावा, या मुद्यावर त्यांनी त्या पक्षाचा राजीनामा दिला होता. मंत्री म्हणून त्यांनी फार अल्प काळ काम केले. नेहरू-लिकायत अलीखान कराराचे निषेधार्थ त्यांनी केंद्रीय मंत्रिमंडळाचा राजीनामा दिला. तथापि त्यांच्या कारकीर्दीत चित्तरंजन चलनशील यंत्र कारखाना व सिंद्री खत कारखाना हे दोन भव्य प्रकल्प त्यांच्या प्रयत्नांनी सुरू होऊन भारताच्या औद्योगिक विकासात मोलाची भर पडली. काँग्रेसला शह देण्यासाठी त्यांनी भारतीय जनसंघाची स्थापना केली. पक्षात पहिल्यापासूनच सर्वांना प्रवेश खुला ठेवण्यात आला होता. १९५२ च्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत ते जनसंघातर्फे लोकसभेवर निवडून आले. संसदेत त्यांनी विरोधी पक्षांची एक राष्ट्रीय लोकशाही आघाडी स्थापन केली. त्याचे नेतृत्व त्यांच्याकडे आले. ते महाबोधी सोसायटीचे अध्यक्ष झाले आणि प्राचीन अवशेष घेऊन त्यांनी ब्रह्मदेश व कंबोडिया या देशांनी भेटी दिल्या. त्यानंतर त्यांनी जम्मू व काश्मीरच्या संपूर्ण विलीनीकरणासाठी अभियान सुरू केले.

या आंदोलनानिमित्त प्रत्यक्ष काश्मीरमध्ये जाऊन प्रचार करण्याचा त्यांनी निश्चय केला. जम्मू-काश्मीरचे तत्कालिन मुख्यमंत्री शेख अब्दुल्ला यांच्या शासनाने त्यांच्या राज्यप्रवेशावर बंदी घातली. बंदी मोडून जम्मू-काश्मीरमध्ये प्रवेश केल्यावर त्यांना अटक झाली. तुरुंगवासातच त्यांचा अंत झाला. या प्रश्नावर शेख अब्दुल्ला यांच्याविरुद्ध त्यावेळी बरेच काहूर माजले होते.

**(साभार : मराठी विश्वकोष)**

**क्लिक...क्लिक...!**



**पनवेल : राज्यातून हजारोंच्या संख्येने नागरिक कामाच्या शोधात स्थलांतर करतात. पनवेल शहरामध्ये बांधकाम क्षेत्रात काम मिळत असल्यामुळे मोठ्या संख्येने नाका कामगार येथे येऊन काम करीत आहेत.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर



# पीरियडमध्ये 'हे' पदार्थ खाल्ल्यास होणार तीव्र वेदना

प्रत्येक मुलीला, महिलेला आयुष्यात मासिक पाळीचा सामना करावा लागतो. मासिक पाळी सुरू असताना होणाऱ्या तीव्र वेदनांसाठी अनेक गोष्टी कारणीभूत ठरू शकतात. काही विशिष्ट प्रकारचे पदार्थ आहेत ज्यामुळे मासिक पाळीच्या दरम्यान तीव्र वेदना होतात. या वेदनांपासून सुटका हवी असेल मासिक पाळीच्या काळात काही पदार्थ खाणे टाळले पाहिजे. ते पदार्थ कोणते, हे जाणून घेऊया..

**प्रोसेस्ड फूड** - फास्ट फूड, पॅकेज्ड स्नॅक्स आणि अती साखर असलेले पदार्थ हे पोटातील सूज वाढवू शकतात. त्यामुळे मासिक पाळीच्या वेदना वाढू शकतात.

**ट्रान् फॅट्स** - तेलकट पदार्थ, मार्जरी, अशा अनेक पदार्थांमध्ये ट्रान्स फॅट्स अधिक असतात, त्यांच्या सेवनाने सूज व जळजळ वाढते व ते अधिक वेदनांसाठी कारणीभूत ठरते .

**कॅफेन** - काही लोकांना कॅफीनचे (कॉफी) सेवन केतल्याने वेदनांपासून आराम मिळू शकतो, परंतु कॅफीनमध्ये असलेल्या व्हॅसोकॉन्स्ट्रिक्टिव्ह इफेक्टमुळे अनेक स्त्रियांना जास्त वेदना जाणवू शकतात.

**हाय सोडियम युक्त पदार्थ** - जास्त सोडियमयुक्त पदार्थांमुळे शरीराच्या अंतर्गत भागात पाणी वाढते आणि सूज येते. यामुळे मासिक पाळीच्या समस्या वाढू शकतात. त्यामुळे खारट स्नॅक्स, प्रक्रिया केलेले मांस आणि कॅन केलेले पदार्थ यांचे सेवन करणे टाळावे.

**मद्यपान** - मद्य किंवा अल्कोहोल हे डिहायड्रेशन आणि सूज येण्यास कारणीभूत ठरते. त्यामुळे मासिक पाळी सुरू असताता मद्यपान करू नये.

**रिफाइंड कार्बोहायड्रेट्स** - पांढरा ब्रेड, तांदूळ आणि साखर युक्त पदार्थांमुळे ब्लड शुगर आणि सूज हे दोन्ही वाढू शकते. ज्यामुळे वेदना वाढतात. त्यांचे सेवन हानिकारक ठरते.

**डेअरी प्रॉडक्ट्स** - डेअरी प्रॉडक्ट्समध्ये लॅक्टोज असतात, ज्यामुळे काही महिलांना मासिक पाळीच्या काळात सूज येणे आणि वेदना वाढणे, असा त्रास होऊ शकतो.

**साखर युक्त पदार्थ** - सोडा, कॅंडी आणि पेस्ट्रीसारखे अधिक साखरयुक्त पदार्थ शरीरातील सूज आणि हार्मोनल असंतुलनासाठी कारणीभूत ठरू शकते. ज्यामुळे वेदना अधिक वाढू शकतात.

# केंद्र सरकारच्या योजना घरोघरी पोहचवा

## भाजप नेते वैकुंठ पाटील यांचे आवाहन ■ पेण तालुक्यात मोदी @ ९ अभियान





**पेण : रामप्रहर वृत्त**

पेण तालुक्यात मोदी @ ९ अभियानांतर्गत घर घर चलो मोहीम हमरापूर विभागातील उर्नोली येथून सुरू करण्यात आली. अभियान यशस्वी करण्यासाठी प्रत्येकाने प्रयत्न केले पाहिजेत, असे आवाहन भाजप नेते वैकुंठ पाटील यांनी सोनखार येथे बोलताना केले.

मोदी ९ घर घर चलो अभियानाला हमरापूर विभागात उर्नोली, सोनखार, कळवे येथून सुरुवात पंतप्रधान किसान योजना, केंद्रीय विकास योजना, आयुष्यमान भारत योजना, प्रधानमंत्री स्वनिधी योजना, प्रधानमंत्री फसल विमा योजना, किसान क्रेडिट कार्ड योजना, प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना अशा अनेक योजना मोदी साहेबांच्या माध्यमातून होत आहेत. त्यांच्या कामाचा हा वसा येथील सर्व भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी घेतला आहे. तो घरोघरी पोहचण्याचा अभियान या ठिकाणी चालू झाले आहे. मी सर्व कार्यकर्त्यांना विनंती करतो की आपल्या गावात जाऊन आपण मिस कॉल द्यायचा आहे, असे वैकुंठ पाटील यांनी सांगितले.

पेण तालुक्यात घर घर चलो अभियानाला हमरापूर विभागातील उर्नोली येथून सुरुवात करण्यात आली. उर्नोली सोनखर, कळवे येथे हे अभियान राबविण्यात आले. या वेळी पेण विधानसभा संयोजक वैकुंठ पाटील, माजी जि. प. सदस्या कौसल्या पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती परशुराम म्हात्रे, कळवे सरपंच दिलीप म्हात्रे, जोहे माजी सरपंच काशिनाथ पाटील, जिल्हा सरचिटणीस वंदना म्हात्रे, पेण तालुका सरचिटणीस स्नेहल सावंत, तालुकाध्यक्ष तन्वी पाटील, शर्मिला वैकुंठ पाटील, नरेंद्र पाटील, हरिश्चंद्र डंगर, गौऱ्या पाटील व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.

कार्यक्रम मोदी ९ जनसंपर्क अभियानमार्फत भारतीय जनता पक्षाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा संयोजक वैकुंठ पाटील यांच्या नेतृत्वाखाली हमरापूर विभागातील गावागावात घर घर चलो अभियाना अंतर्गत सुरू आहे.

या वेळी शर्मिला वैकुंठ पाटील यांनी, भारतीय जनता पक्षाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांनी आपल्या देशामध्ये अमूल्यतुल्य बदल घडवून आणले आहेत. आपला भारत देश हा वेगवेगळ्या स्थानी, जगाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात एक वेगळं अस्तित्व निर्माण करत आहे. आपल्या सर्व हिंदूंच्या मनातील जे स्वप्न होतं आपलं राम मंदिराचं ते सुद्धा मोदीजींच्या कार्यकारिणीत आपण पूर्ण होताना पहात आहोत. केंद्र सरकारच्या योजना गावोगावी जाऊन घरोघरी जाऊन पोहचण्यासाठी हे अभियान असल्याचे सांगितले. या वेळी कौसल्या पाटील यांनीही या अभियानाचे महत्त्व सांगितले.

# नेरळमध्ये एकाच रात्रीत तीन दुकाने फोडली

**कर्जत : प्रतिनिधी**




कर्जत तालुक्यातील नेरळ शहरात चोरीचे सत्र सुरूच आहे. मंगळवारी मध्यरात्री नेरळ बाजार पेठेतील एक मोबाईल शॉप, किराणा दुकान व चप्पलचे दुकान फोडून चोरी झाल्याची घटना घडली आहे. याबाबत नेरळ पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

नेरळ बाजार पेठेतील एक मोबाईल शॉप, किराणा दुकान व चप्पलचे दुकान फोडून चोरी झाल्याची घटना घडली. मोबाईल दुकानातून एक मोबाईल फोन व रोख रक्कम अशी तीस हजार रूपयांची तर किराणा दुकानातून १०, ५ व २ रु चलनातील नाणी एकूण दोन हजार रुपये व चार हजार रुपयांच्या भारतीय चलनातील नोटा, अशी सहा हजार रूपये व काजू बदाम यांची चोरी तर चप्पलच्या दुकानातील चिल्लर चोरटयांनी लांबविल्याची घटना घडली आहे.

यासंदर्भात नेरळ पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे, परंतु सध्या नेरळमध्ये सुरू असलेले चोरीचे सत्र पाहाता या चोरट्यांचा बंदोबस्त नेरळ पोलीसांकडून होणार का? असा प्रश्न मात्र नेरळकरांकडून उपस्थित केला जात आहे.

### आधीही घरफोडींच्या घटना

नेरळमध्ये या आधीही एकाच रात्री झालेल्या घरफोड्या झाल्या होत्या. यामध्ये नेरळ विद्यामंदिर शाळेच्या परिसरात एक बंगला फोडून दोन लाख रूपयांची चोरी, गोकुळ धाम सोसायटी शेजारी बंगल्याच्या खिडकीची लोखंडी ग्रिल तोडून दागिने व आठ हजार रुपये रोख असा साधारण चार लाख ३८ हजार रुपये चोरी झाले होते.

# खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त रोह्यात कार्यक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्त १० जुलै रोजी विविध कार्यक्रम व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर यांनी दिली आहे.

रोहा शहरात ६ जुलै रोजी भव्य भजनाच्या स्पर्धा ज्येष्ठ नागरिक सभागृह येथे आयोजित करण्यात आले आहे. या स्पर्धेला सुरूवात प्रमुख पाहुणे कॅबिनेट मंत्री अदिती तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांच्या उपस्थितीत होणार आहे. यासह ८ जुलै रोजी वाढदिवसानिमित्त १००१ वाह्यांचे वाटप सी. डी. देशमुख कन्या शाळा, उर्दू शाळा, अंजुमन रेवा शाळा, अष्टमी शाळा , दमखडी शाळा आदी शाळांमध्ये करण्यात येणार आहे.

रोहयातील घटकांबळे वस्तीगृह येथे समान वाटप करण्यात येणार आहे. ९ जुलै रोजी संध्याकाळी ४ वाजता शरीरसौष्ठव स्पर्धा भाटे वाचनालय रोहा येथे आयोजित करण्यात आले आहे.

# अपघातातील मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पोलादपूर : प्रतिनिधी**

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर १२ जून २०२३ वर महाड ते पोलादपूर दरम्यान नडगांव येथे महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये झालेल्या अपघातामध्ये एक फिरस्ता वेडसर व्यक्ती मयत झाला असून त्याची ओळख पटविण्यासाठी महाड एमआयडीसी पोलीसांनी आवाहन केले आहे.

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये नडगांव गावाच्या हद्दीमध्ये एक वेडसर इसम फिरस्ता इसम वय अंदाजे ४०ते ४५ वर्ष, डाव्या हाताच्या बोटाला करंगळी नाही, चेहऱ्यावर पूर्ण दाढी वाढलेली आणि केस वाढलेल्या अवस्थेत वाहनाच्या धडकेने अपघातात मरण पावला आहे.

महाड एमआयडीसी पोलिसांनी या फिरस्त्या व्यक्तीविषयी कोणाजवळ काहीही माहिती असल्यास महाड एमआयडीसी पोलीस ठाणे रायगड जिल्हा (०२१४५-२३३०१०) आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक एम. एस. आंधळे (९९२२४४६०८५) तसेच पोलीस हवालदार चिन्नप्पा आर. अंबरगे (९५७९२८६५३९) यांच्याशी तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# रेवदंडा पोलीस ठाणे प्रभारीपदी राहुल अतिग्रे यांची नियुक्ती

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलीस ठाणे प्रभारी म्हणून सहाय्यक पोलीस निरिक्षक राहुल ज्ञानदेव अतिग्रे यांची नियुक्ती झाली असून त्यानी कार्यभार स्विकारला आहे.



रेवदंडा पोलीस ठाणे येथे रूजू होण्यापुर्वी सहा.पो.नि. राहुल अतिग्रे यांनी १२ वर्षे पोलीस दलाची सेवा केली आहे, यामध्ये मुंबई शहर, मीरा भांईदर, भिवंडी, यानंतर रायगड मध्ये पोयनाड पोलीस ठाणे प्रभारी, मुरूड पोलीस ठाणे प्रभारी, तसेच अलिबाग येथे शिघ्र कृती पोलीस दल आदी ठिकाणी पोलीस दलात कार्यरत होते. ते मुळ रहिवाशी कोल्हापुरचे आहेत.

रेवदंडा पोलीस ठाणे विभागात सध्यस्थितीत चोरांचे वाढते प्रमाण, विशेषतः मंदिरातील चोरी प्रकरणे गेल्या वर्षभरात घडून आल्याने त्यांना कृतीशील काम करावे लागणार आहे. रेवदंडा पोलीस ठाणे हद्दीत काही दिवसात जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायत निवडणूका येत असून या निवडणूका शांततेने पार पाडण्याची चोख जबाबदारी त्यांना घ्यावी लागणार आहे.

# ना. आदिती तटकरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव

**रोहे : प्रतिनिधी**



रायगडच्या माजी पालकमंत्री आदिती तटकरे यांनी राज्याच्या कॅबिनेटमंत्री पदाची शपथ घेताच रायगडात एकच जल्लोष करण्यात आला. त्यांच्या समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करून जल्लोष साजरा केला.

ना. आदीती तटकरे यांच्या गीताबाग या निवासस्थानी सोमवारी सकाळपासूनच त्यांना कार्यकर्त्यांची शुभेच्छा देण्यासाठी जमले होते.ना. आदिती तटकरे यांची कॅबिनेट मंत्रीपदी निवड झाल्याने त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत असून त्यांना राष्ट्रवादी प्रदेश सरचिटणीस विजयराव मोरे, रायगड जिल्हा अध्यक्ष मधुकर पाटील, रायगड जिल्हा सरचिटणीस सुरेश मगर, तालुका अध्यक्ष विनोद पाशिलकर, माजी सभापती रामचंद्र सकपाळ, तळा तालुका ओबीसी अध्यक्ष सचिन कदम, निडी तर्फे अष्टमीचे माजी सरपंच राजेंद्र पोकळे, उपसरपंच उत्तम नाईक, हसमुख जैन, अनंत चौलकर, हरीचंद्र वाजंत्री, महिला जिल्हाध्यक्ष उमाताई मुंडे, माणगाव तालुका अध्यक्ष सुभाष केकाणे, पेण तालुकाध्यक्ष दयानंद भगत, शिवराम शिंदे, विलास चौलकर, युवती अध्यक्ष सायली दळवी, चंद्रकांत रोडे, बबन मनवे भाई टक्के यांना अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# मुलींसाठी शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रियेला सुरुवात

**अलिबाग : प्रतिनिधी**

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थीनीकरिता मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह गोंधळपाडा अलिबाग येथे कार्यरत आहे. येथील मोफत प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे.

या वसतिगृहात ८ वी पासून गरीब हुशार होतकरू मागासवर्गीय अनुसूचित जाती ८० टक्के, अनुसूचित जमाती ३ टक्के, विमुक्त जाती भटक्या जमाती ५ टक्के, आर्थिक मागास व इतर मागासवर्गीय दारिद्र्यरेषेखालील कुटुंबातील विद्यार्थिनी ५ टक्के, विशेष मागास प्रवर्ग २ टक्के, अनाथ २ टक्के, अपंग ३ टक्के यांना गुणवत्ता नुसार प्रवेश दिला जातो.

प्रवेश पात्र विद्यार्थीनींच्या पालकांचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न अनुसूचित जाती, अनुसूचित, जमाती विद्यार्थीनीकरिता दोन लाख ५० हजार रुपयांचे आत व विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग विद्यार्थीनीकरिता एक लाख रुपयांच्या आत असावे.

ऑफलाईन प्रवेश अर्जासोबत तहसीलदार यांच्या सहीचा सन २०२२-२०२३मधील उत्पन्न दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता उत्तीर्ण झाल्याचे गुणपत्रक, आधारकार्ड, शाळा अथवा कॉलेजचे बोनाफाईड, रेशनकार्ड या आवश्यक कागदपत्राच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.

सन २०२३-२०२४ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे ऑफलाईन फॉर्म भरण्याकरिता व वसतिगृहाच्या अधिक माहितीकरिता गृहपाल यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे मागासवर्गीय तथा आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृहाच्या गृहपाल सु. एस. गुजेला यांनी कळविले आहे.


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender No. EE/400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated Cost | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-17/23-24/ **RFx No. 7000027878** | Work of Retrofitting (Installation, Testing & Commissioning) of ZIV make Distance and backup relay at 400 kV Nagothane s/s under 400 kV Nagothane div. under EHV O&M Circle, Panvel. | Rs. 8,20,100/- | 12.07.2023 up to 23:59 Hrs. |

**EMD 1% of Estimate Cost & Tender Fee:** Rs. 500/- + GST. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/**

**Contact Person:** Mitesh Goyal (DY. EE) Mob No. 9461456635

e-mail ID: **ee7230@mahatransco.in**

**Note:** All eligible Suppliers/Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**400kV R.S. (O&M) Dn., Nagothane**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered electrical contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification. **Tender Fee:** Rs. 500/- + GST.

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. 7000027872** **Tender No.:** EE/EHV(O&M)/DN/PNL/ e-Tender-35/2023-2024. RFx E-Tender for Work of repairing of 22/33kV Current Transformer/Potential Transformer at various Substations under EHV (O&M) Division, Panvel. **Tender Amount Limited to:** Rs. 5,00,000/- **EMD Amount:** Rs. 5,000/- |
| 2 | Online Downloading of the RFx | 06.07.2023, 17:00 Hrs to 13.07.2023, 23:59 Hrs. |
| 3 | Online Submission of the RFx | On or Before 13.07.2023 up to 23:59 Hrs. |
| 4 | Online Opening of the Techno-Commercial RFx | 14.07.2023 at 11:00 Hrs (if Possible) |

For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): 022-2746 5410.
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Panvel**

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical Contractors on MAHATRANSCO website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender Specification.

| Sr. No. | Tender / Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1 | **Tender No.:** EE/ EHV (O&M)/DIVN/ MHD/Tech/ E-Tender-26/ 2023-24 Dt. 06.07.2023 | **Sub.:** Invitation of SRM E-Tender for the Work of Monkey Patrolling (Video Shooting) of various 220/ 100 kV EHV Lines under KTL S/Dn., Mahad under EHV (O&M) Dn., Mahad. | Up to Rs. 20,18,313/- (Including GST + 1% Labour Cess) |
| 2 | **Tender No.:** EE/ EHV (O&M)/DIVN/ MHD/Tech/ E-Tender-27/ 2023-24 Dt. 06.07.2023 | **Sub.:** Invitation of SRM E-Tender for the Work of Cutting & Chopping Tree in Hilly Area at various 220/100 kV EHV Lines under KTL S/Dn., Mahad under EHV (O&M) Dn., Mahad. | Up to Rs. 16,70,036/- (Including GST + 1% Labour Cess) |

**EMD** will be the 1% of the Estimated Cost or Rs. 5,000/- whichever is higher
**Tender Fee** will be Rs. 500/- plus GST + 1% Labour Cess.
**Bid Submission:** From 06.07.2023 @ 00:00 Hrs to 12.07.2023 @ 23:59 Hrs for above tender.
For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:** The Add'l Executive Engineer, (O): Phone No. 7373101089
**Note:** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**Executive Engineer**
**EHV (O&M) Dn., Mahad**



सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना
### (हक्कसोड पत्राबाबत)

जाहीर सूचनेद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, मौजे-दापोली, ता. पनवेल, जि.रायगड येथील खालील नमूद केलेली जमीन मुळ भूधारक श्रीमती उमाबाई सखाराम पाटील यांचे कडून नवी मुंबई प्रकल्पासाठी संपादित करण्यात आली आहे.

भूसंपादन कायद्यानुसार सदर जमिनीची देय होणारी नुकसान भरपाई वरील भूधारकांनी स्वीकारली असून संपादित जमिनीचा ताबा देखील त्यांनीच दिला आहे.

| गावाचे नाव/ संचिका क्र. | निवाडा क्र. | सर्व्हे नं. / हिस्सा नं. | संपादित क्षेत्र (हे. आर) | निवाडाधारकांचे नाव | भूखंडाचा तपशील | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | नोड | सेक्टर क्र. | भूखंड क्र. | क्षेत्र (चौ. मी.) |
| दापोली १४९ | दापोली ४१/१ | ६२/५ब | ०-१३-० | श्रीमती उमाबाई सखाराम पाटील | उलवे | १६ | A-२८ | १०० |
| एकूण | | | ०-१३-० | | | | | |

शासन निर्णयानूसार वर नमूद संपादित जमिनीपोटी साडेबारा टक्के योजनेअंतर्गत उलवे नोड येथील भूखंड क्र. अ-२८, सेक्टर-१६, क्षेत्र-१०० चौ.मी. या भूखंडाचे इरादापत्र देण्यात आले आहे.

सदर भूखंड वाटपास पात्र असलेल्या भूधारकांपैकी १.रोहिदास विष्णू गायकवाड, २. हिराबाई चंद्रकांत म्हात्रे, ३. सरिता संभाजी म्हात्रे, ४. नंदिनी दत्तात्रेय भगत व ५. लहू विष्णू गायकवाड यांनी दुय्यम निबंधक पनवेल-४ येथे दि. ०९.०१.२०२३ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल४-३४७-२०२३ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित संपादित जमिनीन्वये मिळणाऱ्या दापोली संचिका क्र. १४९ मधील उलवे नोड येथील इरादित भुखंड क्र. अ-२८, सेक्टर-१६, क्षेत्र-१०० चौ.मी. या भूखंडाचे लाभ कै. पंकज सुरेश पाटील (मयत) यांचे वारस म्हणून १.कृपाली पंकज पाटील, २. चैताली पंकज पाटील, ३. क्रिशल पंकज पाटील व ४. सुचिता सुरेश पाटील यांच्या लाभात हस्तांतरित केले आहेत.

सदर हक्कसोडचे महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग दोन, गुरूवार, मे २९, २०१४/ज्येष्ठ ८, शके १९३६, असाधारण क्रमांक २९, प्राधिकृत प्रकाशन, महाराष्ट्र रिजनल टाऊन प्लॅनिंग ॲक्ट - १९६६, नवी मुंबई जमीन विनियोग (सुधारणा) विनियम, २००८ मधील विनियम १० नंतर समाविष्ट करावयाच्या **'१०अ'** मधील **मूद्दा क्र. ii** अन्वये सदर हक्कसोडपत्रामध्ये भूखंड क्र, सेक्टर क्र., व क्षेत्राचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

त्याप्रमाणे वर नमूद हक्कसोडपत्रामध्ये उलवे नोड येथील इरादित भूखंड क्र. अ-२८, सेक्टर-१६, क्षेत्र-१०० चौ.मी.भूखंडाचा तपशील नमूद केला आहे. तसेच मौजे दापोली येथील, निवाडा क्र. १७६, स.नं/हि.नं-९२/६, ४/६, ९५/३, क्षेत्र १-२९-० हे.आर., मौजे वहाळ येथील निवाडा क्र. ४१/१, स.नं/हि.नं. ६२/५ब, क्षेत्र ०-१३-० हे.आर., या संपादित जमिनीचा देखील उल्लेख केला आहे.

| हक्क व हितसंबंध सोडून दिलेल्या व्यक्तिंची नावे | हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|---|
| **कै. उमाबाई सखाराम पाटील उर्फ गायकवाड (मयत) यांचे वारस** | **कै. पंकज सुरेश पाटील (मयत) यांचे वारस** |
| **१. रोहिदास विष्णू गायकवाड** | **१. कृपाली पंकज पाटील** |
| **२. हिराबाई चंद्रकांत म्हात्रे** | **२. चैत्राली पंकज पाटील** |
| **३. सरिता संभाजी म्हात्रे** | **३. क्रिशल पंकज पाटील** |
| **४. नंदिनी दत्तात्रेय भगत** | **४. सुचिता सुरेश पाटील** |
| **५. लहू विष्णू गायकवाड** | |

उपरोक्त नोंदणीकृत हक्कसोड नुसार सिडकोकडून खालील व्यक्ती उपरोक्त भूखंडाचे वाटप स्विकारून करारनामा करण्यास व भूखंडाचा ताबा घेण्यास पात्र ठरू शकतात.

| हक्क व हितसंबंध प्रदान झालेल्या व्यक्तिंची नावे |
|---|
| **कै. पंकज सुरेश पाटील (मयत) यांचे वारस** |
| **१. कृपाली पंकज पाटील** |
| **२. चैत्राली पंकज पाटील** |
| **३. क्रिशल पंकज पाटील** |
| **४. सुचिता सुरेश पाटील** |

वरील इरादित केलेल्या भूखंडा संदर्भात वर नमुद केलेल्या म्हणजेच ज्यांचे लाभात हक्क व अधिकार सोडले आहेत त्या भूधारकांना सदर योजनेनुसार या पुढे साडेबारा टक्के योजने संदर्भातील लाभ देणेची पुढील कायदेशीर प्रक्रिया करण्यासंदर्भात जर कोणाची हरकत /तक्रार असेल तर त्यांनी सदर हरकत /तक्रारीच्या समर्थनार्थ सक्षम न्यायलयाचे आवश्यक ते आदेश प्राप्त करून सदर आदेशाच्या साक्षांकित प्रतीसह मुख्य भूमी व भूमापन अधिकारी, ७ वा मजला, सिडको भवन, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई यांचे कार्यालयात या सूचनेच्या तारखेपासून (३०) दिवसांच्या आत सर्व पुरावे व योग्य त्या कागदपत्रांसह दाखल करावेत. वर नमुद केल्याप्रमाणे वाजवी पुरावा असणारी कोणतीही हरकत/तक्रार सदर मुदतीत प्राप्त न झाल्यास सदर योजने अंतर्गत सिडकोद्वारे करण्यात येणाऱ्या पुढील कायदेशीर कार्यवाहीबद्दल कोणाचीही हरकत नाही असे समजुन वरील इरादित भूखंडाबाबत सिडकोतर्फे पुढील कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. सदर जाहीर सूचना ही संबधित गावाचे ग्रामपंचायत, तहसील कार्यालय तसेच सिडको व सिडकोला योग्य वाटेल अशा ठिकाणी सूचना फलकावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
**(पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/१७९/२०२३-२४

# नवी मुंबईतील नागरी समस्या मार्गी लागणार

## शिवसेना पदाधिकाऱ्यांची पालिका आयुक्तांसोबत चर्चा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई क्षेत्रातील नागरी भागातील समस्यांची सोडवणूक व्हावी म्हणून शिवसेना उपनेते विजय नाहटा आणि जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांनी नवी मुंबई महानगर पालिकेच्या आयुक्त राजेश नार्वेकर यांची शिष्टमंडळासह भेट घेतली. या वेळी आयुक्तांनी नागरी भागातील समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.

नवी मुंबई महापालिका परिवहन सेवेतील ठोक मानधन आणि रोजंदारी पद्धती कर्मचारी यांची पगार वाढ करण्यात यावी तसेच त्यांना सार्वजनिक रजा मंजूर करण्यात याव्यात, रोजंदारी सह ब्रेक पद्धत बंद करण्यात यावी. पालिकेतील विविध विभागात काम करणाऱ्या बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांचा पगार वाढ करण्यात यावा, तसेच त्यांनी पालिकेत आजवर केलेल्या सेवेचा विचार करता त्यांना पालिका सेवेत कायम करण्यात यावे. अंगणवाडी, बालवाडी सेविकांना कायम सेवेत सामावून घ्यावे व त्यांच्या पगारात वाढ करण्यात यावी. त्याच प्रमाणे नवी मुंबई परिसरातील ऐरोली, घणसोली, वाशी, तुर्भे, सानपाडा, नेरूळ, सीवूड्स, बेलापूर येथील नागरी वस्तीतील समस्या सोडवण्या संदर्भात पालिका आयुक्त राजेश नार्वे कर यांना निवेदने देण्यात आली.



या वेळी शिवसेनेचे माजी नगरसेवक यांच्या प्रभागातील प्रलंबित कामे लवकरात लवकर करण्यात यावेत तसेच झोपडपट्टी विभागातील व गाव गावठाण विभागातील नागरिकांच्या समस्या तत्काळ सोडवण्यात याव्यात, अशी मागणी शिवसेना उपनेते विजय नाहटा यांनी पालिका आयुक्तांकडे केली. शाळा सुरू झाल्या असून आज पर्यंत शाळेतील विद्यार्थ्यांना गणवेश, बूट, रेनकोट, आणि इतर शालेय साहित्याचे वाटप झाले नसून शालेय साहित्याचे वाटप लवकरात लवकर करण्याची मागणी करण्यात आली.

या वेळी नवी मुंबईतील शिवसेनेचे माजी नगरसेवक अशोक गावडे, संजू वाडे, सुरेश कुलकर्णी, शिवराम पाटील, ममीत चौगुले, ज्ञानेश्वर सुतार, रामआशीष यादव, प्रशांत पाटील, माजी विरोधी नेत्या सरोज पाटील, विलास भोईर, स्वप्ना गावडे, जगदीश गवते, रामशेठ वाघमारे, उपजिल्हा प्रमुख रोहिदास पाटील, अजित सावंत, गणपत शेलार, दीपक सिंग, कमलेश वर्मा, महिला जिल्हा संघटक शीतल कचरे, शहर संघटक सुरेखा गव्हाणे, नंदा काटे, सह संपर्क प्रमुख सचिन कांबळे, युवा सेना उपजिल्हा प्रमुख साईनाथ वाघमारे आदी शिवसेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### प्रभागातील मागण्यांची निवेदने सादर

या वेळी शिवसेना जिल्हा प्रमुख विजय चौगुले यांनी नवी मुंबईतील नागरिकांना भेडसावत असलेल्या समस्यांची यादीच आयुक्तांना वाचून दाखवली व नागरिकांना भेडसावत असलेल्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी म्हणून विविध प्रभागातील मागण्यांचे निवेदने आयुक्तांना सादर केली. या वेळी जिल्हा संपर्क प्रमुख किशोर पाटकर यांनीही वाशीतील नागरिकांचे प्रश्न मांडून ते तत्काळ सोडवण्यात यावेत, अशी मागणी केली. सर्व निवेदनांचा स्वीकार करत आयुक्तांनी ही कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आस्वासन दिले.

# तुर्भे येथील सर्व्हिस रस्त्याला नाल्याचे स्वरूप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तुर्भे ते वाशी लिंक रस्त्यालगतच्या तुर्भे येथील सर्व्हिस रस्त्यावर मागील आठवड्यापासून पाणी तुंबण्याची समस्या निर्माण झाली आहे. त्यामुळे या रस्त्याला नाल्याचे स्वरूप आले आहे. या प्रकरणी महापालिका प्रशासनाकडे तक्रार करूनही त्याची नोंद घेण्यात आली नाही, अशी माहिती स्थानिक नागरिकांनी दिली. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाची भावना आहे.

सिडकोने एपीएमसी मार्केट मधील वाहनांना तात्पुरत्या पार्किंगसाठी तुर्भे येथे मार्केटच्या चारही दिशांना सर्व्हिस रस्ता तयार केला आहे. तुर्भे स्मशानभूमी ते अरेंजा चौक येथपर्यंत तुर्भे ते वाशी लिंक रस्त्यालगत हा सर्व्हिस रस्ता आहे. या रस्त्याच्या कडेला पावसाळी पाणी वाहून नेण्यासाठी नैसर्गिक नाला तयार करण्यात आला आहे.



तुर्भे एमआयडीसीतून आलेल्या या नाल्यात डोंगराळ भागातून आलेले पावसाचे पाणी थेट वाशीच्या खाडीत जाते. तुर्भे डेपो ते सिटी मॉल पर्यंतचा हा नाला बंदिस्त करण्यात आला आहे. तुर्भे – वाशी रस्त्यावरील पावसाचे पाणी या नाल्यामध्ये जाणे अपेक्षित आहे, मात्र या ठिकाणच्या नाल्यामध्ये पावसाळी पाणी वाहून नेण्याच्या मार्गिका चोकप झाल्या आहेत. या कारणामुळे या रस्त्यावरील पाणी नाल्यामध्ये जात नाही. परिणामी या परिसरात सर्व्हिस रस्त्याला नाल्याचे स्वरूप आले आहे. या पाण्यात काहीजण घाण टाकत असल्याने काही दिवसांपासून साठून राहिलेले हे पाणी गढूळ झाले आहे. तसेच या ठिकाणी दुर्गंधी निर्माण झाली आहे.

या प्रकरणी तुर्भे विभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांकडे तक्रार करूनही त्यावर उपाययोजना करण्यात आली नाही. कचरा वेळेवर उचलला जात नसल्याने पावसाच्या पाण्यात भिजल्याने येथे दुर्गंधी निर्माण झाली आहे. यामुळे या परिसराला बकालपणा आला आहे.

## निवडक

### विषारी औषध प्यायल्याने तरुणाचा मृत्यू

**पनवेल :** दारूच्या नशेत गवतावर मारण्याचे औषध प्यायल्यामुळे ३४ वर्षीय तरुणाचा मृत्यू झाला आहे. तालुक्यातील चिखले गावाजवळील बेलवली बस स्टॉपच्या समोर राहणार किरण पवार याला दारू पिण्याचे व्यसन होते व तो काम धंदा करत नसल्याने त्याला दारू पिऊ नको तसेच काम धंदा कर असे बोलल्याने त्याला राग आला. त्याने दारूच्या नशेत गवतावर मारण्याचे औषध प्यायल्यामुळे त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठेमध्ये दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

### ज्योत्स्ना भरडा उपाध्यक्षपदी नियुक्त



**पनवेल :** मनपाच्या शिक्षिका व राज्य नपा व मनपा शिक्षक संघाच्या सदस्या ज्योत्स्ना भरडा यांची महाराष्ट्र राज्य नपा व मनपा शिक्षक संघाच्या राज्य उपाध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. संघाचे राज्याध्यक्ष अर्जून कोळी यांनी ही घोषणा केली आहे. महाराष्ट्र राज्य नपा व मनपा शिक्षक संघाचे राज्याध्यक्ष अर्जून कोळी, कोकण विभागिय अध्यक्ष वैभव पाटील, रायगड जिल्हाध्यक्ष प्रमोद लांगी व सर्व राज्य पदाधिकारी, पनवेल शिक्षक संघाचे शहर अध्यक्ष दशरथ म्हात्रे, पनवेल शहर महिला आघाडी प्रमुख वैशाली पाटील, कार्याध्यक्ष एस. सुहास, सरचिटणिस जे काझी सर, खजिनदार रमेश पाटील, सहचिटणीस राजेंद्र कोळी आदींसह राज्यभरातून सर्वमुख्याध्यापक व सर्व शिक्षक यांनी ज्योत्स्ना भरडा यांचे अभिनंदन केले आहे.

### वीर वाजेकरशेठ यांची आज जयंती



**उरण :** उरणचे भाग्य विधाते, गोरगरिबांचे दैवत कै. वीर वाजेकरशेठ यांचे प्रकल्पग्रस्त, कामगार, शेतकरी, भूमीपुत्र यांच्यासाठी मोठे योगदान आहे. स्वर्गीय वीर वाजेकरशेठ यांची ११६ वी जयंती गुरुवारी (दि. ६) सकाळी १० वाजता उरण पेठा मिठागर संघ कार्यालय कोटनाका येथे साजरी करण्यात येणार आहे. ज्येष्ठ मान्यवर, चेअरमन, संचालक सभासद यांच्या उपस्थितीत हा जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात होणार आहे. सर्व नागरिकांनी उरण पेठा मिठागर संघ युनियन ऑफिस कोटनाका उरण येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन उरण पेठा मिठागर कामगार संघ, उरण पेठा मीठ उत्पादक सहकारी संस्था, उरण महल सहकारी मजूर संघ तर्फे करण्यात आले आहे.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे स्पर्धेत सुयश

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते विजेत्यांचा सत्कार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील विद्यार्थ्यांनी मास्टरमाइंड्स लीग स्पर्धेतील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त केले आहेत. त्याबद्दल त्यांचे संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी कौतुक करून सत्कार केला.



मास्टरमाइंड ही १२ वर्षे जुनी संस्था आहे जिची स्थापना सह–अभ्यासक्रम उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचे संज्ञानात्मक कौशल्ये, चारित्र्य विकास आणि सर्व शैक्षणिक अनुभव वाढवण्याच्या उद्देशाने करण्यात आली आहे. मास्टरमाइंड्स लीग स्पर्धेत रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील ९४ विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावर सुयश प्राप्त केले आहे. यामध्ये १७ विद्यार्थ्यांना ट्रॉफी देण्यात आली. तर ७७ विद्यार्थ्यांना सुवर्णपदके मिळाली. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत एकूण ४२९ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

विद्यार्थ्यांच्या गुणवंत कामगिरीबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, प्राचार्य राज अलोनी यांनी अभिनंदन केले. दरम्यान, प्रॉडिजी ब्रेन स्पर्धेतील विजेत्यांनाही या वेळी गौरविण्यात आले. पालकांनीही सत्काराचे साक्षीदार होऊन विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल त्यांचे कौतुक केले.



**उरण : गुरूपौर्णिमेनिमित्त आनंदनगर येथे असलेल्या श्री स्वामी समर्थ समाज मंदिरात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच श्री अनुरुद्ध उपासना केंद्र, उरण यांच्या वतीने आनंदी हॉटेल येथे भजन, पूजन, आरती आदी कार्यक्रम झाले. करंजा पाडा येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्राणप्रतिष्ठा, होम, भजन, पूजा, आरती व सर्व भक्तांना महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.**

# पदपथावरील खड्ड्याची तत्काळ डागडुजी करा –पांडुरंग आमले

**नवी मुंबई : बातमीदार**

सानपाडा सेक्टर २ मधील शिवपार्वती इमारतीसमोरील पदपथावर असलेला मोठा खड्डा तत्काळ बंदीस्त करण्याचे संबंधितांना निर्देश देण्याची मागणी भाजप युवा मोर्चाचे नवी मुंबई उपाध्यक्ष व अखिल भारतीय माथाडी संघटनेचे नवी मुंबईचे जिल्हाध्यक्ष पांडुरंग आमले यांनी महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे एका लेखी निवेदनातून केली आहे.



सानपाडा सेक्टर २ मधील शिवपार्वती इमारतीसमोरील पदपथावर नारायण डेअरीसमोर तीन आठवड्यापूर्वी पदपथावर मोठा खड्डा पडला आहे. तीन आठवडे झाले तरी पदपथाची डागडूजी करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून काहीही कार्यवाही झालेली नाही. सध्या पाऊस पडत आहे. रात्रीच्या वेळी वीज गेल्यास पावसामध्ये अंधारात पदपथावर ये–जा करणारे नागरिक त्यात पडून त्यांना इजा होण्याची भीती आहे. ही दुर्घटना टाळण्यासाठी समस्येचे गांभीर्य जाणून घेता, आपण तत्काळ या ठिकाणी असलेला खड्डा बुजवून पदपथाची डागडूजी करण्याचे संबंधितांना निर्देश देण्याची पांडुरंग आमले यांनी महापालि आयुक्तांकडे केली आहे.

# चिरनेरमध्ये सायन्स, कॉमर्स ज्युनिअर कॉलेजचे उद्घाटन

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळावे यासाठी पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटी चिरनेर या विद्यालयात गुरुपौर्णिमेचे औचित्य साधून सोमवारी (दि. ३) सायन्स व कॉमर्स या ज्युनिअर कॉलेजचे उद्घाटन चिरनेर गावातील दानशूर व्यक्ती तथा उद्योगपती पी.पी.खारपाटील यांच्या हस्ते करण्यात आले.



पी.पी.खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून परशुराम धाकू खारपाटील माध्यमिक शाळा, काळू धाकू खारपाटील उच्च माध्यमिक शाळा व ठकूबाई परशुराम खारपाटील इंग्लिश स्कूलची स्थापना केली, परंतु विद्यालयात सायन्स आणि कॉमर्स कॉलेज नसल्याने ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत आहे.विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन आपल्या विद्यालयात दर्जेदार प्राध्यापकांची नियुक्ती करून सायन्स आणि कॉमर्स कॉलेजची उभारणी केली आहे. त्याचा शुभारंभ गुरुपौर्णिमेचे औचित्य साधूने विद्यार्थ्यांच्या उपस्थित केला आहे. या वेळी प्राध्यापक अरुणा अमय पाटील यांनी दर्जेदार शिक्षण देणाऱ्या सायन्स आणि कॉमर्स कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी प्रवेश घेण्याचे आवाहन केले आहे.

या वेळी विद्यालयातील मुख्याध्यापक सूरदास राऊत,उप मुख्याध्यापक अनंत चिर्लेकर, प्राध्यापक संजीव कालकर, प्रा. कुमकुम सिंग, प्रा. स्वप्नजा कुणाल घरत, प्रा. रूपेश रमाकांत कोळी, प्राध्यापक मंदा घरत, शिक्षिका स्मिता राजेश महसूलकर, शिक्षिका सुप्रिया हेमंत म्हात्रे तसेच रघुनाथ नागा पाटील यांनी पी.पी. खारपाटील व राजेंद्र खारपाटील या बंधूंनी गरजवंताची होणारी गैरसोय लक्षात घेऊन ग्रामीण भागात शिक्षणक्षेत्रात उल्लेखनीय काम केल्याने त्यांना उरण पूर्व विभागातून धन्यवाद मिळत आहेत.

# रायगड जिल्ह्यातील बोलीभाषांचे संवर्धन झाले पाहिजे –नमिता कीर

**पनवेल : प्रतिनिधी, वार्ताहर**

रायगड जिल्ह्यात खूप बोलीभाषा आहेत, या बोलीभाषांचे संवर्धन झाले पाहिजे असे आवाहन कोकण मराठी साहित्य परिषदेच्या अध्यक्षा नमिता कीर यांनी पनवेल येथे केले. पनवेल येथे रायगड जिल्हा कोकण मराठी साहित्य परिषदेची बैठक झाली. या बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना कोमसापच्या अध्यक्षा नमिता कीर यांनी प्रतिपादन केले.




कोमसाप पनवेल आणि नवीन पनवेल शाखेच्या वतीने करण्यात आलेल्या या बैठकीस कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ, कोकण मराठी साहित्य परिषदेच्या युवाशक्ती प्रमुख दीपा ठाणेकर, कोमसापचे जनसंपर्कप्रमुख रायगडभूषण प्रा. एल. बी. पाटील, रायगड जिल्हा कोमसापच्या उपाध्यक्षा सुजाता पाटील, कोमसापचे जिल्हा प्रतिनिधी गणेश कोळी उपस्थित होते.

कोकण मराठी साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. प्रदीप ढवळ यांनी, साहित्य संस्था म्हणजे चंगलवाद्यांसाठी ही संस्था नाही. आपल्या साहित्य संस्थेमध्ये युवकांची पिढी अजून कशी गतिमान करता येईल याकडे लक्ष दिले पाहिजे. जिल्ह्यातील वेगवेगळ्या शाखांमध्ये कोणी काम करत नसेल त्यांना काढून टाका, त्यांच्या जागी दुसऱ्यांची नेमणूक करून संस्थेचे आदर्शवत काम करा, असे त्यांनी सांगितले.

युवा शक्ती प्रमुख दीपा ठाणेकर यांनी, सोशल मीडियावर कोमसाप तसेच युवाशक्तीच्या कार्यक्रमांचा आढावा त्यांनी घेतला.

# मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर शिवनेरी बसला अपघात

## चालकासह सात जण जखमी

**खालापूर, खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर बोरघाटातील खोपोली बायपासजवळ ढेकू गावाच्या हद्दीत शिवनेरी बसने ट्रकला मागून धडक दिल्याने चालक व सहा प्रवासी जखमी झाले आहेत. हा अपघात मंगळवारी (दि. ४) रात्री ११.३०च्या सुमारास झाला.

मिळालेल्या माहितीनुसार शिवनेरी बस (एमएच १२-व्हीएफ ३९२४) वरील चालक विकास लाड (वय ४०, रा. पुणे) हा स्वारगेट ते ठाणे या बसमधून सहा प्रवाशांसह एक्स्प्रेस वेवरून प्रवास करीत होता. उतारावर चालकाचे नियंत्रण सुटल्याने या बसने तिसऱ्या लेनमधून चालणाऱ्या ट्रकला (एमएच १०-डीटी ४२९३) पाठीमागून जोरदार धडक दिली. या अपघातात



बसची केबिन दबल्याने चालक लाड अडकला होता. त्याला आयआरबी पेट्रोलिंग, देवदूत यंत्रणा, महामार्ग वाहतूक पोलीस यंत्रणा बोरघाट, अपघातग्रस्तांच्या मदतीसाठीच्या टीम मेंबर्सनी कसोशीने प्रयत्न करून बाहेर काढले आणि कामोठे एमजीएम रुग्णालयाकडे रवाना केले आहे, तर बसमधील सहा प्रवाशांना किरकोळ दुखापत झाल्याने खोपोली नगरपालिकेच्या रुग्णालयात आणण्यात आले. या जखमींमध्ये मंदार माळेकर (३९, घाटकोपर), अक्षय कुमार स्वादे (२९), निमय नाडकर्णी (२९, नेरूळ), अनुजा साबळे (२७), ज्योती साबळे (२८, सांताक्रूझ, मुंबई), मालू शिशुल शिंगाडे (३२, पुणे) यांचा समावेश आहे. यापैकी मात्र मंदार माळेकर व अक्षय स्वादे यांना जास्त मार लागल्या असल्याने त्यांनाही एमजीएम रुग्णालयात हलविण्यात आले, तर बाकी प्रवाशांना प्रथमोपचार केल्यानंतर सोडण्यात आल्याचे रुग्णालय सूत्रांनी सांगितले. या अपघातातील बसचालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात येत असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक शितल कुमार राऊत करीत आहेत.

# महिलेचे दागिने खेचून पळणाऱ्यांना पोलिसांनी पाठलाग करून पकडले



## नागोठणे-वडखळ परिसरात थरार

**नागोठणे, पेण : प्रतिनिधी**

महिलेचे दागिने खेचून दुचाकीवरून पळणाऱ्या दोन चोरट्यांना नागोठणे पोलिसांनी वडखळ पोलिसांच्या मदतीने पकडल्याची घटना मंगळवारी (दि. ४) घडली. दोन्ही आरोपींवर नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी माधुरी गिरीश नाईक (रा. तरशेत, ता. पेण) मंगळवारी (दि. ४) १२ वाजता शिहू नाका येथून त्यांच्या मुलीला शाळेतून घेऊन सुरक्षा नगर येथे घरी चालल्या होत्या. या वेळी पेझारी-नागोठणे रोडवर दोन व्यक्ती शिहू बाजूकडून स्कूटीवरून आल्या आणि वडखळकडे जाण्याचा रस्ता कुठे आहे असे विचारण्याचा बहाणा करून महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व साखळी असे एकूण एक लाख ६८ हजार रुपयांचे दागिने खेचून पळून गेले.

याबाबत नागोठणे पोलीस ठाण्यात माहिती मिळताच पोलिसांनी तत्काळ नाकाबंदी केली. सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले असता दोन्ही आरोपी स्कूटीवरून वडखळ बाजूकडे जात असताना दिसून आले. त्यामुळे वडखळ पोलीस ठाण्याला कळवून फुटेज पाठविण्यात आले. त्यानुसार त्या परिसरातही नाकाबंदी करण्यात आली तसेच संशयित आरोपी दिसताच पोलिसांनी तत्काळ त्यांचा पाठलाग सुरू केला. वडखळ येथे मुंबई-गोवा महामार्गावर नागोठणे पोलिसांनी वडखळ पोलिसांच्या मदतीने व प्राप्त सीसीटीव्ही फुटेजवरून शहानिशा करून मितेष म्हात्रे (२१, वडखळ) आणि दर्शन कोठेकर (२४, गडब) या दोन्ही आरोपींना मुद्देमालासह ताब्यात घेतले. त्यांची स्कूटीही जप्त करण्यात आली आहे. या प्रकरणी नागोठणे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक संदीप पोमान, उपनिरीक्षक रोहिदास भोर, रणजित जाधव, श्री. शिद, सहाय्यक उपनिरीक्षक प्रमोद कदम, हवालदार विनोद पाटील, नाईक सचिन पाटील, नितेश पाटील, कॉन्स्टेबल रामनाथ ठाकूर, सत्यवान पिंगळे, सायबरचे काम पाहणारे हवालदार संतोष म्हात्रे, अंमलदार दिनेश ढेणे, अमोल म्हात्रे, देसाई, नाईक, धर्मेंद्र वर्तक, विश्वनाथ पाटील, जनार्दन म्हात्रे, प्रवीण पाटील यांनी सहभाग घेतला.

### अशा आवळल्या आरोपींच्या मुसक्या

नाकाबंदीदरम्यान दुपारी साडेबाराच्या सुमारास शिहू गावाजवळील महिलेच्या गळ्यातील दागिने चोरी करणारे दोन व्यक्ती स्कूटीवरून नागोठण्याकडून वडखळकडे येत असताना फ्लायओव्हर ब्रिजवर वडखळ पोलीस पथकाने त्यांना थांबवून त्यांची चौकशी केली. त्या वेळी ते आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. लागलीच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. त्यांना अटक करण्यात आली असून चोरी करण्यासाठी वापरलेल्या स्कूटी (एमएच ०३-डीएल ४११८) आणि मंगळसूत्र, चेन असा एकूण सुमारे एक लाख ५० हजार रुपये किमतीचा ऐवज हस्तगत केला आहे. या कामगिरीमुळे जनतेतून पोलिसांचे कौतुक करण्यात येत आहे.



**नागोठणे : भाजप महिला मोर्चाच्या रोहा तालुका उपाध्यक्ष अपर्णा अंकुश सुटे यांना वाढदिवसानिमित्त जिल्हा उपाध्यक्ष श्रेया कुंटे, ज्येष्ठ कार्यकर्ते सिराज पानसरे, सामाजिक कार्यकर्ते ॲड. गणेश जाधव, ऐनघर ग्रामपंचायतीचे माजी सदस्य संतोष लाड, भाजप शिक्षण सेल तालुका उपाध्यक्ष धनराज उमाळे, ओबीसी तालुकाध्यक्ष अंकुश सुटे, युवा कार्यकर्ते आदित्य सुटे, नागोठणे शहर अध्यक्ष शितल नांगरे, सोशल मीडिया दक्षिण रायगड संयोजिका प्रियांका पिंपळे, नागोठणे विभागीय अध्यक्ष मुग्धा गडकरी आदींनी शुभेच्छा दिल्या.** (छाया : श्यामकांत नेरपगार)

## कर्जत पोलीस निरीक्षकपदी सुरेंद्र गरड यांची नियुक्ती

**कर्जत : प्रतिनिधी**



कर्जत पोलीस ठाण्याचे निरीक्षक के. डी. कोल्हे यांची बदली अलिबाग मुख्यालयी झाल्याने तेथील रिक्त झालेल्या जागेवर सुरेंद्र जगन्नाथ गरड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

गरड हे मुंबई येथे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक म्हणून कार्यरत होते. त्यांनी नवी मुंबई, अलिबाग येथेही काम केले असून तब्बल आठ वर्षे गडचिरोली येथे काम केले आहे.


पत्रकारांशी संवाद साधताना गरड यांनी, कर्जतमध्ये होणाऱ्या चोऱ्यांचा बंदोबस्त करण्याचे काम हाती घेण्यात येणार असून तालुक्यात फार्महाऊस व रिसॉर्टचे प्रमाण खूप असल्याने तेथेही लक्ष घालणार आहे. सर्वसामान्यांना न्याय मिळण्याचा दृष्टीने आमचा प्रयत्न राहील, असे स्पष्ट केले.

## 'सनातन'कडून गुरूचरणी कृतज्ञता

**नागोठणे : बातमीदार**

सनातन संस्थेच्या वतीने अलिबाग येथील भाग्यलक्ष्मी मंगल कार्यालयात गुरूपौर्णिमा उत्सव साजरा करण्यात आला. या निमित्ताने अनेक साधकांनी गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त केली.

या उत्सवात प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना सनातन संस्थेचे साधक नागोठणे येथील भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते डॉ. रोहिदास शेळके यांनी हिंदू धर्माची महती कथन केली. हिंदू धर्माचे अद्वितीयत्व, ३३ कोटी देवतांचे महत्त्व व कार्य, व्यक्ती तितक्या प्रकृती व तितके साधना मार्ग हा सिद्धांत, गुरू-शिष्य परंपरा याबाबत अनेक उदाहरणे देऊन मार्गदर्शन केले.




विशाखा आठवले यांनी राष्ट्र व धर्म जागृतीविषयी मार्गदर्शन केले. त्यात त्यांनी धर्म जागृतीसाठी काय केले पाहिजे, लव्ह जिहाद, हिंदूंनी संघटित होणे ही काळाची गरज कशी आहे यावर प्रकाश टाकला तसेच सनातन संस्था राबवत असलेल्या विविध समाजोपयोगी उपक्रमांची माहिती दिली.

शेवटी जिज्ञासूंना प्रश्नोत्तरे देऊन त्यांच्याशी संवाद साधण्यात आला व कार्यक्रमाची सांगता झाली. सूत्रसंचालन आल्हाद माळगावकर यांनी केले.

गुरुपौर्णिमा म्हणजे गुरुंप्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस. सनातन संस्थेच्या वतीने देशभरात ७२ ठिकाणी गुरुपौर्णिमा उत्सव भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. उत्सवाच्या प्रारंभी श्री व्यासपूजा आणि सनातन संस्थेचे श्रद्धास्थान परमपूज्य भक्तराज महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, गुरूपौर्णिमेच्या निमित्ताने अनेक साधकांनी गुरुचरणी कृतज्ञता व्यक्त केली.

## मजगाव शाळेत वक्तृत्व स्पर्धेस प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

गुरूपौर्णिमेनिमित्त रायगड जिल्हा परिषदेच्या मुरूड तालुक्यातील मजगाव येथील मराठी शाळेत वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.



भारतीय संस्कृतीत गुरूचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मानवी आयुष्यात गुरू संस्कार देतात, शिकवण देतात. त्यामुळे जीवनात यश प्राप्त होते. अशा या गुरूची महती विद्यार्थ्यांना कळावी यासाठी वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केल्याचे मुख्याध्यापक हेमकांत लक्ष्मण गोयजी यांनी सांगितले.

या स्पर्धेत ब्राम्ही मानाजी प्रथम, ईश्वरी कोंडाजी द्वितीय, सास्थी बुल्लू तृतीय व दुर्वा चुनेकर हिने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकाविले. स्पर्धेसाठी चेतन चव्हाण, रंजिता वरसोलकर, हर्षा नांदगावकर व प्रमिला फुंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष निखील मानाजी, उपाध्यक्ष उमेश कोंडाजी, सदस्य अमित कोळी, योगेंद्र गोयजी यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले.

## हिरवळ महाविद्यालयात गुरूपौर्णिमा उत्साहात साजरी

**माणगाव : प्रतिनिधी**

हिरवळ एज्युकेशन ट्रस्टच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ॲण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या विद्यार्थी परिषदेतर्फे महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकरिता गुरूपौर्णिमेच्या औचित्याने विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी उपस्थित होत्या.

या कार्यक्रम अंतर्गत विद्यार्थ्यांनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी कविता, गायन अशा विविध उपक्रमांचे आयोजन केले गेले होते. त्यानंतर विद्यार्थ्यांनी शिक्षक व गुरू याबद्दल आपली मते व्यक्त केली. महाविद्यालयाच्या प्रमुख सल्लागार डॉ. संध्या कुलकर्णी यांनी गुरूपौर्णिमा व त्याचे महत्त्व याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य सुदेश कदम यांनी विद्यार्थ्यांना गुरूचे विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील महत्त्व सांगून गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. प्रा. राकेश वडवळकर यांनी या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसोबतचे अनुभव मांडले. प्रा. कपिल जोशी यांनी विद्यार्थ्यांना गुरूंची महती यावर मार्गदर्शन केले. हिरवळ संस्थेचे अध्यक्ष किशोर धारिया, संचालिका सोनाली धारिया, प्राचार्य कदम यांनी सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना गुरूपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या.

## रेवस ते पाली पायी पदयात्रा

**अलिबाग : प्रतिनिधी**


अलिबाग तालुक्यातील रेवस ते अष्टविनायकांपैकी एक क्षेत्र बल्लाळेश्वर देवस्थान असलेल्या पालीपर्यंत रेवस व बोडणी कोळीवाडा येथील भाविकांनी पदयात्रा काढली. त्यास प्रतिसाद लाभला.

मंडळाचे अध्यक्ष धर्मा कोळी यांच्या अध्यक्षतेखाली गेली १२ वर्षे पायी दिंडी, पालखी सोहळा उत्साहात होत आहे. पदयात्रेतील पहिली मुक्काम शिहू येथे, तर दुसरा उन्हेरे येथील गरम पाण्याचा कुंड या ठिकाणी करण्यात आला. यानंतर गुरुवारी (दि. ६) पहाटे संकष्टी चुतर्थीच्या दिवशी पाली येथे गणरायाची पूजा, अभिषेक व आरती व दर्शन झाल्यानंतर रेवस या गावी परतीचा प्रवास सुरु होईल. समस्थ कोळी बांधव व भागिनी या पायी दिंडीत मोठ्याा उत्साहात सहभागी झालेल्या दिसून आल्या. मत्स्यदुष्काळ दूर होऊन व्यवसायात बरकत व्हावी, असे सर्वांचे गणरायाचरणी मागणे आहे.



**माणगाव : राज्याच्या मंत्रिमंडळात निवड झाल्याबद्दल आदिती तटकरे यांचे पंचायत समितीचे माजी सदस्य शैलेश भोनकर, सामाजिक कार्यकर्ते रवींद्र अर्बन, सागर भोनकर, साले ग्रामपंचायतीचे माजी सरपंच दीपक ढाकवळ, सुरव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच राजेंद्र जाधव यांनी अभिनंदन केले.** (छाया : सलीम शेख)

# फुल पीक योजनेच्या लाभातून फुलवा फुलशेती!



कोकण विभाग म्हणजे आंबा, काजू सारख्या फळपिकांचे आगार समजले जाते. त्याचबरोबर आता त्याच्या जोडीला कोकणातील शेतकऱ्यांना फुल पिकांच्या शेतीमध्येही चांगले उत्पन्न मिळवू लागले आहे. कोकणात विशेषतः ठाणे, पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांमध्ये मोगरा, निशिगंध, गुलाब व सोनचाफा या फुलपिकांचे उत्पादन घेतले जात आहे. अजूनही कोकणात फुलपिकांच्या उत्पादनाला मोठा वाव आहे. फुलपिकांची शेतीसाठी राज्य शासनाने हातभार लावला असून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजनेंतर्गत फुलपीक लागवडीसाठी अनुदान देण्याची योजना राबवित आहे. कोकणातील शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन फुलपिकाच्या शेतीमध्ये प्रगती करावी.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत फळबाग वृक्ष जन्य वन पिके मसाला पिके व फुल पिके अशा विविध पिकांसाठी एक वर्ष ते तीन वर्ष अनुदान तत्वावर शासकीय योजना कार्यान्वित आहे. ३० मार्च २०२२च्या शासन निर्णयानुसार वैयक्तिक लाभार्थ्यांच्या सलग शेतजमिनीवर, शेताच्या बांधावर व पडीक जमिनीवर फुलपिके लागवड कार्यक्रम राबविण्यास आणि तांत्रिक व प्रशासकीय मान्यताबाबत सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत. १५ डिसेंबर २०२२च्या शासन निर्णयानुसार द्राक्ष, केळी, ड्रॅगनफ्रुट आणि मसाला पिके तसेच गुलाब, मोगरा, निशिगंध, व सोनचाफा या चार फुलपिकांचा समावेश करून आणि या पिकांचे आर्थिक मापदंडास मान्यता प्राप्त आहे.

योजनेचे मुख्य उद्दिष्ट :- फुलपिकांचे उत्पादनात वाढीमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढ होवून निर्यातीस चालना मिळण्यास मदत होईल.

* अनुदेय फुलपिके :- मोगरा, निशिगंध, गुलाब व सोनचाफा.
* मोगरा :- योजनेंतर्गत झालेले फुलपीक लागवड क्षेत्र - १७२.९२. आर्थिक (हे) मापदंड लाभ रु.२७६७५०/-.
* निशिगंध :- योजनेंतर्गत झालेले फुलपीक लागवड क्षेत्र - ०.१०. आर्थिक (हे) मापदंड लाभ रु. ३२१४६१/-.
* गुलाब :- योजनेंतर्गत झालेले फुलपीक लागवड क्षेत्र - २.३०. आर्थिक (हे) मापदंड लाभ रु. ३६१४५०/-
* सोनचाफा :- योजनेंतर्गत झालेले फुलपीक लागवड क्षेत्र - २.९३. आर्थिक (हे) मापदंड लाभ रु. २३०८६०/-.असे एकूण योजनेंतर्गत झालेले फुलपीक लागवड क्षेत्र - १७८.२५. आर्थिक (हे) मापदंड लाभ रु.११९०५२१/-.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, शहापूर, मुरबाड, कल्याण, भिवंडी, पालघर जिल्ह्यातील वसई-विरार, पालघर, रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल, कर्जत इत्यादी तालुक्यात तसेच रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात मोगरा, निशिगंध, गुलाब व सोनचाफा या फुलपिकांचे उत्पादन घेतले जाते.

कोकण विभागात फुलपिक लागवडीसाठी पुरेसा वाव आहे. फुलपिकांसाठी एक वर्षात संपूर्ण अनुदान देय आहे. या योजनेत लागवडीसाठी कमीत कमी ०.०५ हे. व जास्तीत जास्त २.० हे. प्रती लाभार्थी क्षेत्र मर्यादा आहे. यासाठी महात्मा गांधी रा.ग्रा. रो.ह.योजनेचे जॉब कार्ड, ७/१२ उतारा, ८-अ, योजनेसाठी अर्ज व संयुक्त खातेदार असल्यास संमती पत्र, बँक पासबुकची छायांकित प्रत ही कागदपत्रे आवश्यक आहेत.

फुलपिक लागवड अत्यंत फायदेशीर असून एकाच वर्षानंतर फुल पिकाचे उत्पादन सुरू होऊन मुंबईसारखी बाजारपेठ जवळ असल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला आर्थिक फायदा होऊ शकतो. पिकांचे उत्पादन हे जवळपास बारमाही असल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होण्यासाठी महत्त्वाचे आहे. रायगड जिल्ह्यातील पेण, उरण, पनवेल, अलिबाग, रोहा, आणि इतरही तालुक्यातील आणि जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उज्ज्वला बाणखेले यांनी केले आहे.

**-मनोज शिवाजी सानप,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**रायगड-अलिबाग**

# भारतीय संघ सॅफ चॅम्पियन

## बलाढ्य कुवेतला नमवून इतिहास रचला

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारतीय फुटबॉल संघाने सॅफ चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत कुवेतचा पराभव केला. भारताने पेनल्टी शूटआऊटमध्ये कुवेतचा ५-४ असा पराभव केला. बंगळुरूच्या श्री कांतीरवा स्टेडियमवर निर्धारित ९० मिनिटे दोन्ही संघ १-१ने बरोबरीत होते. ३० मिनिटांच्या अतिरिक्त वेळेतही कोणत्याही संघाला दुसरा गोल करता आला नाही. अशा परिस्थितीत पेनल्टी शूटआऊटमध्ये सामन्याचा निकाल लागला. या विजयासह भारताने नवव्यांदा विजेतेपद पटकावले.

सॅफ फुटबॉल चॅम्पियनशिपचा अंतिम सामना गतविजेता भारत आणि कुवेत यांच्यात खेळला गेला. भारतीय संघाने आपला उत्कृष्ट विक्रम कायम राखत विजेतेपद पटकावले. तत्पूर्वी, उपांत्य फेरीत भारताने पेनल्टी शूटआऊटमध्ये लेबनॉनचा ४-२ असा दुसरीकडे कुवेतने बांगलादेशचा १-० असा पराभव केला होता. भारतीय संघ दुसऱ्यांदा कुवेतविरुद्ध खेळला. याआधी 'अ' गटात दोन्ही संघांमध्ये १-१ अशी बरोबरी होती.

अंतिम फेरीत कुवेतचा पराभव करून भारताने सॅफ चॅम्पियनशिप स्पर्धेचे विजेतेपद नवव्यांदा पटकावले आहे. भारत यापूर्वी १९९३, १९९७, १९९९, २००५, २००९, २०११, २०१५ आणि २०२१मध्ये चॅम्पियन बनला होता. स्पर्धेच्या १४ वर्षांच्या इतिहासात भारत नऊ वेळा चॅम्पियन म्हणून उदयास आला आहे आणि चार वेळा उपविजेता ठरला.




### गुरप्रीत सिंग ठरला हिरो!

*गोलरक्षक गुरप्रीत सिंगने भारताला हा विजय मिळवून दिला. त्याने पेनल्टी शूटआऊटमध्ये चमकदार कामगिरी करीत कुवेतचा कर्णधार खालिद अल इब्राहिमचा अंतिम शॉट रोखला. निर्धारित प्रत्येकी पाच शॉट्सनंतर दोन्ही संघ प्रत्येकी चार बरोबरीत होते. भारतासाठी उदांता सिंग आणि कुवेतसाठी मोहम्मद अब्दुल्ला हे लक्ष्य गाठण्यात चुकले. चार-चार बरोबरीनंतर अचानक सर्व चाहत्यांनी श्वास रोखून धरला होता. अशावेळी यामध्ये जो संघ गोल करण्यास चुकतो तो थेट पराभूत होतो. त्याला दुसरी संधी मिळत नाही. सडन डेथमध्ये भारताकडून नौरेम महेश सिंगने गोल केला. त्याचवेळी कुवेतचा कर्णधार खालिदचा फटका भारताचा गोलरक्षक गुरप्रीत सिंगने रोखला आणि भारत विजयी झाला.*

# मुंबईकर अजित आगरकर बनला टीम इंडियाचा मुख्य निवडकर्ता

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारताचा माजी अष्टपैलू क्रिकेटपटू अजित आगरकर टीम इंडियाच्या निवड समितीचा अध्यक्ष बनला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) मोठी जबाबदारी सोपवली आहे.

एका स्टिंग ऑपरेशनमध्ये अडकल्यानंतर भारतीय क्रिकेट निवड समितीचे माजी अध्यक्ष चेतन शर्मा यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. गेल्या काही महिन्यांपासून हे पद रिक्त होते. आता मुंबईकर अजित आगरकरकडे ही जबाबदारी सोपवण्यात आली आहे. आगरकरने काही दिवसांपूर्वीच आयपीएल संघ दिल्ली कॅपिटल्सच्या प्रशिक्षकपदाचा राजीनामा दिला होता.

४५ वर्षीय अजित आगरकरकडे २६ कसोटी, १९१ एकदिवसीय आणि चार टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आहे. त्याच्या नावावर २६ कसोटी सामन्यात ५९ बळी आहेत, तर १९१ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने २८८ बळी घेतले आहेत. याशिवाय चार टी-२० सामन्यात त्याने तीन बळी घेतले आहेत. यासह आगरकरने आयपीएलच्या ४२ सामन्यांमध्ये २९ फलंदाजांना बाद केले. दुसरीकडे अजित आगरकरच्या कसोटी फॉरमॅटमध्ये फलंदाजीबद्दल बोलायचे तर या खेळाडूने १६.७९च्या सरासरीने ५७१ धावा केल्या आहेत, तर १९१ एकदिवसीय सामन्यांमध्ये त्याने १४.५९च्या सरासरीने १,२६९ धावा जमवल्या.






# विंडीजपाठोपाठ झिम्बाब्वे वर्ल्डकप स्पर्धेतून बाहेर

**हरारे : वृत्तसंस्था**

भारतात होणाऱ्या वन डे विश्वचषकासाठी सध्या झिम्बाब्वेमध्ये पात्रता फेरीचे सामने खेळवले जात आहेत. ही स्पर्धा आता अंतिम टप्प्यात आली असून श्रीलंकेने विश्वचषकासाठी पात्रता मिळवली आहे, तर झिम्बाब्वे आणि वेस्ट इंडिज हे दोन संघ शर्यतीत होते, पण विंडीजपाठोपाठ आता झिम्बाब्वेचा संघदेखील आगामी विश्वचषकातून बाहेर झाला आहे.



झिम्बाब्वेला वर्ल्डकप पात्रता स्पर्धेत मंगळवारी स्कॉटलंडकडून धक्कादायक पराभव पत्करावा लागला. झिम्बाब्वेला विजय मिळवून भारतात होणाऱ्या वर्ल्डकप स्पर्धेची पात्रता निश्चित करता आली असती, पण त्यांचे आव्हान संपुष्टात आले आहे. श्रीलंकेने वर्ल्डकप स्पर्धेतील पात्रतेसाठीची एक जागा निश्चित केल्यानंतर दुसऱ्या जागेसाठी झिम्बाब्वे आघाडीवर होते. त्यात स्कॉटलंडविरुद्धची आजची लढत महत्त्वाची होती. नाणेफेक जिंकून झिम्बाब्वेने प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. ख्रिस्तोफर मॅकब्रीज (२८) आणि मॅथ्यू क्रॉस (३८) यांनी चांगली सुरुवात करून दिली. पण, तेंदाई चतारा व सीन विलियम्स यांनी या दोघांचीही विकेट घेतली. ब्रेंडन मॅक्म्युलेन (३४) व जॉर्ज मुन्सी (३१) यांनी डाव सावरण्याचा प्रयत्न केला. या दोघांच्या विकेटनंतर स्कॉटलंडचा डाव गडगडला. मिचेल लिस्क (४८) व मार्क वॅट (२१*) हे दोघं खेळले म्हणून त्यांना आठ बाद २३४ धावांपर्यंत पोहोचता आले.

आतापर्यंत स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या झिम्बाब्वेचीही कोंडी झाली. ख्रिस सोलने त्याच्या पहिल्या स्पेलमध्ये पाच षटकांत २० धावांत तीन विकेट्स घेत झिम्बाब्वेला मोठे धक्के दिले. त्यात ब्रेंडनने एक विकेट घेऊन १० षटकांत झिम्बाब्वेची अवस्था ४ बाद ४१ अशी झाली. सिकंदर रझा हाच झिम्बाब्वेसाठी आशेचा किरण उरला होता. त्याने पाचव्या विकेटसाठी रायन बर्लसह ६१ चेंडूंत ५४ धावांची भागीदारी करून संघाला कमबॅक करून दिले, पण ख्रिस ग्रीव्हसने स्कॉटलंडला ही महत्त्वाची विकेट मिळवून दिली. सिकंदर ४० चेंडूंत दोन चौकार व एक षटकारासह ३४ धावांवर बाद झाला.

रायन बर्ल खंबीर उभा राहिला आणि त्याने वेस्ली माधेव्हेरेसोबत खिंड लढवली. या दोघांनी ७४ चेंडूंत ७३ धावा जोडल्या. माधेव्हेरे ४० धावांवर पायचीत झाला. या विकेटनंतर झिम्बाब्वेचा डाव गडगडला. बर्ल ८३ धावांवर बाद झाला अन् सामना फिरला. झिम्बाब्वेचा संपूर्ण संघ २०३ धावांवर तंबूत परतला.

### स्कॉटलंड की नेदरलँड्स?

स्कॉटलंडने झिम्बाब्वेचा पराभव करून त्यांना बाहेरचा रस्ता दाखवला. त्यामुळे स्कॉटलंड आणि नेदरलँड्स यांच्यात होणाऱ्या सामन्यातील विजयी संघ आगामी वन डे विश्वचषकासाठी पात्र ठरेल. लक्षणीय बाब म्हणजे झिम्बाब्वेच्या पराभवामुळे शेजारी पाकिस्तानने सुटकेचा निश्वास सोडला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही, कारण मागील वर्षी ऑस्ट्रेलियात पार पडलेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषकात पाकिस्तानने झिम्बाब्वेसमोर लोटांगण घातले होते.

# प्रवीण कुमार थोडक्यात बचावला

**मेरठ : वृत्तसंस्था**

भारतीय संघाचा माजी खेळाडू प्रवीण कुमारचा मेरठ शहरात कारमधून जात असताना त्याच्या कारला भरधाव वेगाने येणाऱ्या कंटेनरने धडक दिली. त्या वेळी प्रवीणसोबत त्याचा मुलगाही होता आणि दोघेही या अपघातातून थोडक्यात बचावले.

प्रवीण कुमार मंगळवारी (दि. ४) रात्री १० वाजण्याच्या सुमारास मेरठमधील पांडव नगर येथून त्याच्या लँड रोव्हर डिफेंडर कारने येत होता. यानंतर त्याची कार आयुक्तांच्या निवासस्थानाजवळ पोहचली असता, त्याचवेळी त्याच्या कारला कंटेनरची धडक बसली. यानंतर गाडीचे मोठे नुकसान झाले. या अपघातात प्रवीण आणि त्याचा मुलगा थोडक्यात बचावले. पोलिसांनी तत्काळ कारवाई करत आरोपी कंटेनर चालकाला घटनास्थळावरून ताब्यात घेतले.






# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलची लॉन टेनिस स्पर्धेत चमक

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून विद्यार्थिनींचा गौरव




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलच्या दोन विद्यार्थिनींनी लॉन टेनिस स्पर्धेत सुयश प्राप्त केले आहे. संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि प्राचार्य राज अलोनी यांनी त्यांचा सत्कार करून कौतुक केले. विशेष म्हणजे विजेत्या विद्यार्थिनी या बहिणी आहेत.

विद्यालयाची इयत्ता दहावीतील विद्यार्थिनी आनंदी भुतडा हिने अनेक ट्रॉफी मिळवल्या आहेत तसेच विविध किताब पटकाविले आहेत. यामध्ये अखिल भारतीय रँकिंग सुपर सिरीजचे १६ वर्षाखालील एकेरी व दुहेरीचे विजेतेपद आणि १८ वर्षाखालील गटाचे उपविजेती यांचा समावेश आहे, तर तिची बहीण अनन्या भुतडा हिनेदेखील विविध स्पर्धांमध्ये सहभाग घेत चुणूक दाखविली. अन्ययाने अखिल भारतीय रँकिंग सुपर सिरीजमध्ये १४ वर्षाखालील गटात क्वार्टर फायनलपर्यंत मजल मारली तसेच अन्य स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात दुसरी फेरी खेळली.

# विराटची इन्स्टाग्राम स्टोरी चर्चेत



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आगामी वेस्ट इंडिज दौऱ्यावर खेळल्या जाणाऱ्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेत भाग घेण्यासाठी भारतीय संघ तेथे पोहचला आहे. या मालिकेत सर्व चाहत्यांच्या नजरा पुन्हा एकदा विराट कोहलीच्या कामगिरीवर खिळल्या आहेत. अशात आता विराटने इन्स्टाग्रामवर शेअर केलेल्या स्टोरीची चर्चा आहे.

वेस्ट इंडिजविरुद्धची कसोटी मालिका सुरू होण्यापूर्वी विराट कोहलीने मंगळवारी इन्स्टाग्रामवर दोन स्टोरी शेअर केल्या आहेत. त्याच्या दोन्ही पोस्ट्स चाहत्यांना समजणे सोपे नाही. याकडे एक गूढ पोस्ट म्हणूनही पाहिले जात आहे, ज्यामध्ये कोहली हातवारे करून आपले म्हणणे मांडताना दिसत आहे.

कोहलीने पहिल्या स्टोरीमध्ये बौद्ध भिचू थिच न्हाट हान्चा कोट शेअर केला आहे. 'आपण सर्व एकाच झाडाची पाने आहोत असे लिहिले आहे. आपण सर्व एकाच महासागराच्या लाटा आहोत.' दुसऱ्या पोस्टमध्ये कोहलीने तत्त्वज्ञ जे कृष्णमूर्ती यांचे फ्रीडम फ्रॉम द नॉन हे पुस्तकातील एक पॅरा शेअर केला आहे. त्यामध्ये असे लिहिले आहे की, जर तुम्ही स्वतःची इतरांशी तुलना केली नाही तर तुम्ही जे आहात तेच राहाल. तुलनेने तुम्ही अधिक हुशार, अधिक सुंदर, पुढे होण्याची आशा कराल, पण तुम्ही असे कराल का? यामुळे तुमची ऊर्जा खराब होईल. कोणत्याही तुलनेशिवाय स्वतःला पाहिल्याने तुम्हाला खूप ऊर्जा मिळेल.'











दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com